cmyk

## संपादकीय

### मोदी-राहुल यांनी संसदेचा इतिहास जपला !

ऑपरेशन सिंदूरअंतर्गत सरकारने पाकिस्तानवर जी कारवाई केली त्यामध्ये अनेक गोष्टींची लपवाछपवी केली जात असल्याची टीका यापूर्वीही अनेक वेळा काँग्रेसने केली होती. संसदेतील चर्चेमध्येसुद्धा राहुल गांधी यांच्यासह सर्वच विरोधी पक्षनेत्यांनी त्याच टीकेचा पुनरुच्चार केला. या मोहिमेमध्ये भारताची निश्चित किती हानी झाली आणि हा संघर्ष थांबवण्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत आहेत, त्यात कितपत तथ्य आहे याबाबत खुलासा करण्याची मागणी राहुल गांधी यांनी जोरकसपणे केली होती.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-९७ | शुक्रवार, दि.१ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### दहावी बारावीच्या परीक्षेसाठी करता येणार नोंदणी

पुणे-महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेला खाजगीरीत्या प्रविष्ट होण्यासाठी १७ नंबरचा अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असून इच्छुक विद्यार्थ्यांना एक ऑगस्ट पासून ऑनलाईन पद्धतीने नोंदणी होणार आहे.

### काँग्रेसचे कैलास गोरंट्याल यांचा भाजपात प्रवेश

मुंबई-काँग्रेसचे नेते आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी भाजपचे इतर नेतेही उपस्थित होते.

### सरकारी जमिनींवरील अतिक्रमणं नियमित होणार

मुंबई : राज्यातील २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार विशेष मोहिमेद्वारे सरकारी जमिनीवरील ५०० चौरस फुटांपर्यंतची निवासी अतिक्रमणे मोफत नियमित करण्यात येणार असून, उर्वरित अतिक्रमणे बाजारमूल्यानुसार दंड आकारून नियमित करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी केली आहे. राज्यातील सुमारे ३० लाख अतिक्रमणांना याचा लाभ होणार आहे.

### शालार्थ आयडी घोटाळ्यात आणखी २ अटकेत

छ. संभाजीनगर : शालार्थ आयडी घोटाळ्यात गठीत 'एसआयटी'ने विद्यमान प्राथमिक शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे व माध्यमिक शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांना अटक केली आहे. पोलिसांनी या दोघांच्याही चौकशीसाठी पोलीस कोठडीची मागणी केली होती. मात्र त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. राज्यस्तरीय एसआयटी गठीत झाल्यानंतरची ही पहिली मोठी कारवाई आहे.

### प्रांजल खेवलकरांसह सर्व आरोपींना न्यायलयीन कोठडी

पुणे- प्रांजल खेवलकरांसह सर्व आरोपींना न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. शिवाजी नगर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. त्यानुसार खेवलकरांसह इतर ४ आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. प्रांजल खेवलकर हे रोहिणी खडसे यांचे पती आहेत.

# किसान संपदा योजनेसाठी आता ६५२० कोटींचे बजेट

## शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारचा मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांसाठी एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला असून किसान संपदा योजनेचे बजेट आता ६५२० कोटी रुपये करण्यात आले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ६ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.



### किसान संपदा योजना काय आहे?

प्रधानमंत्री किसान संपदा योजना शेतकऱ्यांसाठी असणारी भारत सरकारची महत्वाची योजना आहे. या योजनेचा हेतू देशातील कृषी आणि अन्न प्रक्रिया क्षेत्राचे आधुनिकीकरण करणे हे आहे. याद्वारे कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जातो. १९२० कोटी रुपयांचा निधी कशासाठी वापरला जाणार?

त्यापैकी एक निर्णय शेतकऱ्यांच्या संदर्भात आहे. तसेच उर्वरित निर्णय हे ईशान्य भारतातील रेल्वे नेटवर्क मजबूत करण्याबाबत आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बोलताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, प्रधानमंत्री किसान संपदा योजनेचे बजेट वाढवून ६५२० कोटी रुपये करण्यात आले आहे. यामुळे अन्न प्रक्रिया क्षेत्रात शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तसेच राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळासाठी २००० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. ▶▶ पान २ वर

# ज्ञानेश्वरी मुंडेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेताच एसआयटी स्थापन

## महादेव मुंडे खून प्रकरण: पंकज कुमावत यांच्या नेतृत्वात होणार तपास

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गुरुवारी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी भेट घेतल्यानंतर महादेव मुंडे हत्याप्रकरणी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. आता या प्रकरणाचा तपास पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली केला जाणार आहे.**

महादेव मुंडे यांचा खुन झाल्यानंतरही कसलाही तपास केला जात नव्हता. आ. सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरल्यानंतर राज्यभर याची चर्चा झाली. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे






यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी होऊन गुन्हेगारांना गजाआड करण्याची मागणी केली होती. त्यातच गुरुवारी त्यांनी मुंबईत वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये आज सर्वपक्षीय बैठक


### मनोज जरांगे पाटलांची प्रमुख उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**



परळी येथील महादेव मुंडे यांचा खून होऊन बरेच महिने लोटले तरी अजूनही त्यातील आरोपींना अटक करण्यात आले नाही. त्यामुळे महादेव मुंडे यांना न्याय देण्यासाठी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस मनोज जरांगे ▶▶ पान २ वर

## जायकवाडी धरणातून ९ हजार क्यूसेकने पाणी सोडले



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**जायकवाडी धरण (नाथसागर जलाशय) गुरुवारी ९०.१३ टक्के क्षमतेने भरल्यामुळे दुपारी ३ वाजता ते ३.३० वाजेदरम्यान धरणाच्या सांडव्याद्वारे गोदावरी नदीपात्रात ९ हजार ४३२ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.**

पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे आणि उर्ध्व धरणांतून येणाऱ्या पाण्याच्या जोरदार आवक लक्षात घेता विसर्गाची आवश्यकता भासली. त्यामुळे धरणाचे एकूण १८ दरवाजे प्रत्येकी ०.५ फुटाने उघडण्यात आले आहेत. पुढील काही तासांत पाण्याची आवक वाढल्यास विसर्गाचे प्रमाण वाढवले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्क राहावे, असे आवाहन जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. दरम्यान, जायकवाडी ▶▶ पान २ वर

## कोकाटेंचे कृषी खाते दत्ता भरणेंकडे जाणार?

### फडणवीस-अजित पवार यांच्या बैठकीनंतर खातेबदलावर एकमत



**मुंबई । प्रतिनिधी**

**विधान भवनात रम्मी खेळणे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना चांगलेच महागात पडणार असल्याचे संकेत असून त्यांचे खाते आता दत्ता मामा भरणे यांच्याकडे देण्यात येणार आहे. तर कोकाटे यांच्याकडे क्रीडा खाते देणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे.**

विधान भवनात रम्मी खेळण्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्यासाठी सरकारवर दबाव वाढत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सुनिल तटकरे यांच्यात गुरुवारी बैठक पार पडली. यात कोकाटे यांच्याविषयी चर्चा झाल्याची माहिती असून कोकाटे यांचे खातेबदल करण्यावर एकमत झाल्याचे समजते. दत्तामामा भरणे यांना कृषीखाते तर कोकाटे यांना क्रीडा ▶▶ पान २ वर

## परळीसाठी तीन नायब तहसीलदार नियुक्त

### माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश



**परळी । प्रतिनिधी**

**परळी तालुक्याला तीन नवे नायब तहसीलदार मिळाले असून, महसूल व निवडणूक विभागाच्या कामकाजात आता गती येणार आहे. माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, राज्य शासनाने अधिकृत आदेश जारी केले आहेत.**

या आदेशानुसार परळी तहसील कार्यालयात महसूल विभागासाठी नायब तहसीलदार पंडित सुरवसे, निवडणूक विभागासाठी अशोक भोजने यांची तर परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात महेश वाकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बऱ्याच काळापासून परळी तहसील ▶▶ पान २ वर

## माजलगावमध्ये एकाच रात्री तीन ठीकाणी चोऱ्या

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात गुरुवारी पहाटेच्या दोन ॲग्रो सह एक मोटर रिवायडींगची दुकान फोडल्याची घटना घडली. यावेळी अज्ञात चोरट्यांनी दुकानातील कॅश रकमेसह दोन जुन्या मोटर लंपास केल्या. माजलगाव शहरातील जुन्या मोंढ्यात असणारी श्रीनिवास ॲग्रो एजन्सी, स्वप्निल रामेश्वर सवादे यांच्या दुकानाचे शटर तोडून दुकानात असलेल्या गल्ल्यामधून ९ हजार ६०० रुपये लंपास केले. तर माऊली प्रल्हाद माने यांच्या शिवशंभो ॲग्रो एजन्सी, दुकानाचे शटर ▶▶ पान २ वर

## सरकारी नौकरीत असलेल्या लाडकी बहिणींवर होणार कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

**लाडक्या बहिणींचा लाभ पुरुषांनी घेतल्याचे उघड झाल्यावर आता सरकारी नौकरीत असलेल्या महिलांनी सुध्दा लाडक्या बहिणीचा लाभ घेतला असून अशा महिलांवर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी पुणे येथे बोलताना दिली आहे. तसेच या महिलांनी जो या योजनेंतर्गत आतापर्यंत लाभ घेतला तो सुध्दा वसुल केला जाणार आहे.**

अदिती तटकरे म्हणाल्या, ज्या महिला सरकारी नोकरीला आहेत, अशा महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले आहे, त्यापैकी बऱ्याच जणींनी स्वत:हून आपले अर्ज मागे घेतले, तसेच मिळालेला ▶▶ पान २ वर

## मालेगाव बॉम्बस्फोट: आरोपींची निर्दोष मुक्तता



**मुंबई । प्रतिनिधी**

**मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. आरोपींच्या विरोधातील बहुतांश आरोप हे चुकीचे असल्याचे म्हटले गेले. या प्रकरणातील साध्वी प्रज्ञासिंह यांच्यासह ७ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला असून ७ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. या निकालानंतर हिंदुत्ववादी संघटनांना फटाके फोडण्यास मालेगावात ▶▶ पान २ वर

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ होणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्रातील मोदी सरकार लवकरच देशभरातील सुमारे एक कोटी केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना रक्षाबंधनापूर्वी मोठी भेट देण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक जुलै २०२५ मध्ये महागाई भत्त्यात होणाऱ्या वाढीची आतुरतेने वाट पाहत आहेत. आता त्यांचा हा प्रतीक्षेचा काळ लवकरच संपणार आहे. यापूर्वी मार्च २०२५ मध्ये सरकारने मध्ये २ टक्के वाढ केली होती, ज्यामुळे तो ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढला होता.

माध्यमांतील वृत्तांनुसार, यावेळी जुलै २०२५ साठी मध्ये ३ टक्के वाढ (७) होण्याची शक्यता आहे. ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| धान्य (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५४.०० क्विंटल | २,४२१ | २,८०० | २,६१७ |
| ज्वारी/हायब्रिड: ५२.५० क्विंटल | १,८७१ | २,७८१ | २,३४३ |
| मका/लोकल:०.५० क्विंटल | २,२७० | २,२७० | २,२७० |
| तूर : २२.०० क्विंटल | ४,००० | ६,४५० | ५,६६५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २४.०० क्विंटल | २,०११ | २,९२१ | २,५४८ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ४,७०० | ६,२५१ | ५,७६२ |

## वयोवृद्ध आईसाठी दरमहा भत्ता देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**७४ वर्षीय वयोवृद्ध महिलेच्या निवृत्ती पश्चात उदरनिर्वाहासाठी मुलांकडून आर्थिक सहाय्य मिळावे या मागणीस अनुसरून दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात जिल्हाधिकारी बीड यांनी स्पष्ट आदेश दिला असून, मुलांनी दरमहा प्रत्येकी २००० इतकी रक्कम आईस देणे बंधनकारक ठरवले आहे. यावेळी वयोवृद्ध आईकडून(महिला)च्या वतीने विधीज्ञ पंकज रायबोळे यांनी कामकाज पाहिले.**

रतनबाई विठ्ठल गायकवाड (रा. स्नेहनगर, परळी वैजनाथ) यांनी आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ अंतर्गत दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजी अर्ज सादर केला होता. अर्जात दोन्ही मुलांकडून कारभारी व प्रकाश विठ्ठल गायकवाड (रा. जळगाव, अंबाजोगाई) दरमहा प्रत्येकी ₹१०,००० इतकी निर्वाह भत्ता रक्कम मागितली होती.सदर अर्जावर सुनावणी घेऊन उपविभागीय अधिकारी, परळी यांनी दिनांक ५ जुलै २०२३ रोजी निर्णय दिला. या निर्णयात दोन्ही मुलांनी प्रतिमाह प्रत्येकी ₹२००० रक्कम आईस अदा करावी, असे आदेशित करण्यात आले. या आदेशाविरोधात संबंधितांनी अधिनियमाच्या कलम १६ नुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले होते.याप्रकरणी १८ फेब्रुवारी ते १२ जून २०२५ या कालावधीत ▶▶ पान २ वर

## प्राण्यांसाठीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णवाहिकेचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

### प्राणीमित्रांची सेवा हेच मुख्य ध्येय ठेवून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**समस्त महाजन या संस्थेच्या अर्हम अनुकंपा प्रोजेक्ट अंतर्गत मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील गोमाता आणि इतर प्राण्यांच्या सेवेसाठी असलेल्या सुपर स्पेशालिटी प्राणी रुग्णवाहिकेचे लोकार्पण आज पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.**

या उद्धाटनप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त गिरीश शहा, विश्वस्त परेश शहा, तसेच समस्त जैन समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समस्त महाजन या संस्थेच्या अर्हम अनुकंपा प्रोजेक्टअंतर्गत सुरू करण्यात आलेली ही प्रगत तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णवाहिका मुंबई, ठाणे, आणि पालघर या भागांतील गोमाता व इतर जखमी प्राण्यांवर उपचार ▶▶ पान २ वर



cmyk

अग्रलेख

# मोदी – राहुल यांनी संसदेचा इतिहास जपला !

ऑपरेशन सिंदूरअंतर्गत सरकारने पाकिस्तानवर जी कारवाई केली त्यामध्ये अनेक गोष्टींची लपवाछपवी केली जात असल्याची टीका यापूर्वीही अनेक वेळा काँग्रेसने केली होती. संसदेतील चर्चेमध्येसुद्धा राहुल गांधी यांच्यासह सर्वच विरोधी पक्षनेत्यांनी त्याच टीकेचा पुनरुच्चार केला. या मोहिमेमध्ये भारताची निश्चित किती हानी झाली आणि हा संघर्ष थांबवण्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत आहेत, त्यात कितपत तथ्य आहे याबाबत खुलासा करण्याची मागणी राहुल गांधी यांनी जोरकसपणे केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधी किंवा इतर विरोधी पक्षनेत्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्या प्रत्येक मुद्द्याला उत्तर देताना ऑपरेशन सिंदूर ही कशी यशस्वी मोहीम होती आणि अजूनही ऑपरेशन सिंदूर कसे सुरू आहे याची माहिती दिली. जगाच्या पाठीवरील कोणत्याही नेत्याच्या सांगण्यावरून किंवा त्याच्या मध्यस्थीमुळे भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्षाला पूर्णविराम मिळाला नाही, तर भारतीय हल्ल्याला घाबरून पाकिस्ताननेच हल्ले थांबवण्याची विनंती केल्यामुळे भारताने हा संघर्ष थांबवला, असे अत्यंत स्पष्ट शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चर्चेला उत्तर देताना सांगितले. भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्ष थांबवण्यामध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी कोणतीही मध्यस्थी केली नाही हे स्पष्टपणे या सभागृहामध्ये नरेंद्र मोदी यांनी सांगावे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली होती. नरेंद्र मोदी यांनी ती मागणी मात्र पूर्ण केली नाही. त्यामुळे या विषयाला आता पूर्णविराम मिळेल का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार असले, तरी ही चर्चा थांबणार नाही, असे संकेतही मिळत आहेत. कारण अजूनही मोदी सरकार ऑपरेशन सिंदूरबाबत अनेक गोष्टी लपवत असल्याबाबत टीका केली जात आहेत.

विरोधी पक्षांच्या बाजूने जरी राहुल गांधी यांनी तीव्रपणे खिंड लढवली असली तरी सरकारच्या बाजूने पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर हे किती मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले याचे दाखले दिले. अर्थात, या निमित्ताने भारतीय लोकशाही पद्धतीचा महानपणसुद्धा समोर आला. संसदेच्या व्यासपीठावर सरकारवर अशा प्रकारे टीका करण्याचे स्वातंत्र्य विरोधी पक्षांना दिले जाते आणि प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा अधिकारही विरोधकांना दिला जातो हेच या चर्चेवरून स्पष्ट झाले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुन्हा एकदा भारतीय राजकारण नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी या दोन केंद्राभोवतीच फिरत असल्याचे अधोरेखित झाले. सर्वसामान्य नागरिक जेव्हा टीव्हीच्या पडद्यावर अशा प्रकारच्या चर्चा पाहतात तेव्हा राहुल गांधी भाषण करत असताना त्यांचे सर्व मुद्दे त्यांना पटतात आणि या मुद्द्यांना उत्तरे देणाऱ्या नरेंद्र मोदी यांचेही मुद्दे सर्वसामान्य नागरिकांना पटतात. कारण शेवटी एखादा विषय कशाप्रकारे मांडण्यात येतो हे सर्वात जास्त महत्त्वाचे असते. म्हणूनच विरोधकांच्या मागणीप्रमाणे संसदेच्या पटलावर या विषयावर चर्चा झाली असली तरी हा विषय संपणार नाही. अजूनही विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या मनात अनेक शंका आहेत आणि संसदेबाहेरसुद्धा या शंका प्रदर्शित करण्याचे काम केले जाईल. कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अजून एकदा आपण भारत–पाकिस्तान यांच्या लष्करी संघर्षामध्ये मध्यस्थी केली होती असा उल्लेख केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या वादाला तोंड फुटले आहे. सरकारने कितीही खुलासे केले तरी ते विरोधी पक्षांना पटणार नाहीत आणि विरोधी पक्षांना जे हवे आहे तशा प्रकारचे खुलासे सरकारकडून केले जाणार नाहीत हेच या चर्चेवरून सिद्ध झाले आहे. एखाद्या विषयातील तथ्य किंवा वास्तव समोर आणण्यापेक्षा टीकेला टीकेनेच उत्तर देण्याचा इतिहास आजपर्यंत संसदेतील चर्चेने जपला आहे आणि यावेळीसुद्धा तेच दिसून आले. राहुल गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जोशपूर्ण भाषणे भारतीय नागरिकांना ऐकायला मिळाली. नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी हा राजकीय संघर्ष लोकांना आवडू लागल्याने आता कोणत्या एखाद्या नवीन विषयावर संसदेमध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी यांचा असा भाषणांचा सामना होईल याचीच वाट आता सर्वसामान्य नागरिक पाहणार आहेत.

# आझाद क्रांती सेनेची डाके पिंपरी येथे शाखा स्थापना

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील डाके पिंपरी या ठिकाणी दि ३१ जुलै गुरुवार रोजी आझाद क्रांती सेनेची शाखा स्थापना करण्यात आली तेथील युवकांनी आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भव्य शाखा स्थापन केली या शाखेचे उद्घाटन माजलगाव तालुकाप्रमुख अशोक ढगे यांच्या हस्ते करण्यात आले.**

डाके पिंपरी येथील असंख्य युवकांनी आझाद क्रांती सेनेमध्ये प्रवेश घेतला या शाखा उद्घाटन प्रसंगी सेनाप्रमुख राजेश घोडे यांनी युवकांना मार्गदर्शन केलं यावेळी ते म्हणाले की विषमतावादी व्यवस्था संपवण्यासाठी बंड करावे लागेल गरीब हा गरीब होत चालला आहे व श्रीमंत हा श्रीमंत होत चालला आहे देशात एक वेगळी विषमता निर्माण होत चालली आहे ही विषमता संपवण्यासाठी आझाद क्रांती सेनेची मशाल आपण आज हातात घेतली आहे ही मशाल तुम्ही तेवत ठेवा या मशालीमध्ये आम्ही आमच्या रक्ताचं तेल करून टाकून ती ज्वलंत ठेवू आझाद क्रांती सेना हे फक्त नाव नसून हा एक विचार आहे. जो विस्थापित गावकुसाबाहेरील गरीब वंचित शोषितांचा आवाज म्हणजे आझाद क्रांतीसेना आहे.या संघटनेमध्ये अठरापगड जमातींना घेऊन हे संघटन मागासलेल्या समाजाला शैक्षणिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी आझाद क्रांती सेनेचा जन्म झालेला आहे.असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले.तसेच या कार्यक्रम प्रसंगी अशोक ढगे,किसन भिसे,शाहीर साळवे यांचीही भाषणे झाली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सरपंच रमेश आल्हाट,जेष्ठ नागरिक युवा वर्ग मोठ्या प्रमाणामध्ये मोठ्या उत्साहामध्ये नवचेतन घेऊन सामील झाला होता शहरांमधून भव्य मोटर सायकल रॅली काढून डाके पिंपरी येथे शाखेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी शाखेचे (अध्यक्ष) गणेश आल्हाट, (उपाध्यक्ष) लखन आलाट, (महासचिव) बालासाहेब, आल्हाट, (सहसचिव) हनुमंत आढागळे (सल्लागार) राम शेरकर (कोषाध्यक्ष) बालासाहेब आल्हाट (सहसंघटक) भागवत घोंगडे असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुणांनी परिश्रम घेतले.

## जालन्याच्या नवीन जिल्हाधिकारी अशिमा मित्तल आज पदभार घेणार

जालना । प्रतिनिधी



जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची जिल्हाधिकारी ठाणे येथे बदली झाली असून जालना येथे नव्याने श्रीमती अशिमा मित्तल या जिल्हाधिकारी म्हणुन बदलून येत आहेत. नवीन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल आज १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेणार आहे अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. तसेच या जिल्ह्यामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल, जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी महिला, तसेच पाच तालुक्यामध्ये पाच तहसीलदार महिला, अप्पर जिल्हाधिकारी महिला, जिल्हा पुरवठा अधिकारी महिला, महिला अधिकाऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण झाली.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी एक उत्तम प्रशासक शांत स्वभाव म्हणुन त्यांची जालना जिल्ह्यात एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. तसेच सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून त्यांनी जालना जिल्हयात विविध विकासाच्या योजना प्रभावीप्रमाणे राबविल्या. दरम्यान, श्रीमती अशिमा मित्तल यापूर्वी नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. त्यांची पदोन्नतीवर जालन्याच्या जिल्हाधिकारी म्हणुन बदली झाली असून जिल्हाधिकारी पदाचा बहुमान त्या पहिल्यांदाच स्विकारत आहेत. विशेष म्हणजे जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनू याही नुकत्याच बदलून आलेल्या असून जिल्हाधिकारी आणि सीईओ या दोन्हीही महिला अधिकारी या जिल्ह्यात काम पाहणार आहेत तसेच पालकमंत्री पंकजा मुंडे , अप्पर जिल्हाधिकारी महिला, जिल्हा पुरवठा अधिकारी महिला तसेच जिल्ह्यामधील पाच तहसीलदार महिला अशी जिल्ह्याची ओळख महिला राज म्हणून निर्माण झाली आहे.

# सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण–सचिन मुळूक




**बीड । प्रतिनिधी**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकर विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे गुरुवारी (दि.३१) वाटप करण्यात आले. सामाजिक भान जपत, शिक्षणासोबत संवेदनशीलतेचे संस्कार देणारा हा उपक्रम विशेष लक्षवेधी ठरला असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.**

कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून झाली. त्यानंतर गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, दप्तर आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा, शिवसेना बीड जिल्हा संघटक योगेश नवले, प्रीती बागलने, लता हातागळे, श्रीराम कुरे, किशन चौव्हाण, बाळासाहेब गव्हाणे, भैय्यासाहेब वाघमारे, सनी भैय्या चांदणे, राहुल भैय्या शिंदे, गणेश हातगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक राहुल चांदणे यांनी सांगितले की, ‘‘लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षित, वंचित वर्गासाठी आयुष्यभर झुंज दिली. त्यांच्या विचारांना आदरांजली वाहताना शिक्षणासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. कार्यक्रमास शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे सुरू करा

## बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम पुर्णत्वास येत असून बीड,अहिल्यानगर,मुंबई या मार्गावरती प्रवासी रेल्वे चालू करावी अशी मागणी बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समीतीच्या काल झालेल्या बैठकीत करण्यात आली.**

काल बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री.सत्यनारायणजी लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी कृती समितीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीमध्ये प्रामुख्याने अहिल्यानगर बीड परळी या मार्गावरील रेल्वेच्या कामाच्या संदर्भात तसेच विद्युतीकरणाच्या कामा संदर्भात चर्चा करण्यात आली. या सोबतच कृती समितीच्या अध्यक्षांनी या मार्गावरील कामाच्या संदर्भातील आढावा या बैठकीत मांडला. या सोबतच या बैठकीमध्ये रेल्वेच्या अहिल्यानगर बीड परळी मार्गावरील ज्या काही आडीअडचणी असतील त्या संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील रेल्वे कामाच्या सर्वे संदर्भात चर्चा करण्यात आली तसेच धाराशिव, बीड, आहिल्यानगर या मार्गावरील कामाचा देखील आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच बीड, आहिल्यानगर, मुंबई या मार्गावर रेल्वेचे विद्युतीकरणाचे काम पुर्ण होत असून बीड, अहिल्यानगर,मुंबई ही प्रवाशी रेल्वे सुरू करण्यात यावी या संदर्भातले निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार असून या संदर्भात बीड चे खासदार बजरंग सोनवणे, आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात येणार असून धाराशिव, बीड, संभाजीनगर या मार्गावरील रेल्वेच्या कामासाठी या दोन खासदारांसोबत शिष्टमंडळ रेल्वे मंत्र्यांना भेटण्या संदर्भात चर्चा झाली आणि इतर ही आडीअडचणी सोडवणे संदर्भात कृती समिती लवकरच पुढचे पाऊल उचलणार असून या दोन्ही मार्गाच्या कामासंदर्भात लवकरच कृती समितीनी आढावा घेण्याचे ठरले असून बीड ,अहिल्यानगर, मुंबई ही प्रवाशी रेल्वे प्रामुख्याने चालु करण्यात यावी अशी मागणी रेल्वे मंत्र्यांना भेटून करण्याचे बैठकीत ठरले या बैठकीस बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा,सुनिल नामदेवराव क्षीरसागर, सुरेश मेखे, विलासरा बडगे , अरूण डाके, प्रा.अरूणराव भस्मे, बीड जिल्हा व्यापारी संघटेनेचे अशोक मनोहर अप्पा शेटे, सुरेश नटवरलाल बुध्ददेव, लईक अहेमद, शिवाजी जाधव, व इतर सदस्य उपस्थित होते.

# जालन्यात जुगार अड्यावर छापा ११ जण पकडले ४ लाखाचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**



पोलीस ठाणे सदर बाजार डिबी चे पोउपनि श्री. म्हस्के हे पोलीस ठाणे येथे हजर असताना त्यांना गोपनिय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, रहेमान गंज येथील रहीवाशी महेश बिरादार यांच्या घराच्य वरच्या मजल्यावर रुममध्ये काही पुरुष गोलाकार बसुन तीर्रट नावाचा जुगार खेळ खेळत आहे अशी माहीती मिळाल्याने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या लेखी आदेशाने , पोनि श्री. संदीप भारती यांचे आदेशाने तसेच मार्गदर्शनाखाली, आम्ही व स्टाफचे पोहेकॉ/१२६७ जाधव, पोहेकों/ १३९३ पटेल, पोकॉ/ ९६३ गोफणे, पोकॉ/१५१९ तेजनकर, पोकों/१४४६ कटकम मपोकॉ/१४८ दांडगे व दोन पंचासह मिळालेल्या माहितीवरुन सदर ठिकणी ३१ जुलै रोजी छापा टाकून कारवाई केली असता तेथे मगनसिंग राजपूत व सिंधीबाजार ,राजू इंगळे गांधीचमन जालना ,शेख हसन शेख हबीब वय ३७ वर्ष रा. हिंदनगर जालना ,नईम खान महेबूब खान वय ३५ वर्ष रा. रहेमान गंज जालना ,फतेह मोहम्मद शेख हबीब वय ४७ वर्ष रा. सुंदरनगर जालना ,करन राजपूत , मच्छिंद्र पांडव रा. भोईपूरा , महेश बिरादार रहेमान गंज ,शेख आसीफ शेख ख्वाजा वय ३८ वर्ष रा. लालबाग जालना,अबूबकर युसूफ कुरेशी वय २७ वर्ष रा चमडा बाजार जालना ,संतोष म्हस्के हे तीरंट नावाचा जुगाराचा खेळ खेळतांना मिळुन आले त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे रोख रक्कम १७००० रुपये, चार मोटार सायकल, ११ मोबाईल असे एकुन ४,३४,००० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे ४,५ महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकूमार बन्सल , मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयूष नोपाणी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री संदीप भारती यांचे नेतृत्वात डी.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ/१२६७ जगन्नाथ जाधव, पोहेकॉ /१३९३ नजीर पटेल, पोकॉ/९६३ दुर्गेश गोफणे, पोकों/ १५१९ गणेश तेजनकर, पोकॉ/ १४४६ राहूल कटकम, मपोकॉ/ १४८ दांडगे व चालक सददाम सय्यद यांनी केली.

पान १ वरून...

### किसान संपदा योजनेसाठी

त्यामुळे सहकारी संस्था मजबूत होण्यास फायदा होणार आहे. या बैठकीत प्रधानमंत्री किसान संपदा योजनेसाठी २०२१–२२ ते २०२५–२६ या कालावधीसाठी १९२० कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चासह एकूण ६५२० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. १९२० कोटी रुपयांची रक्कम बहु–उत्पादन अन्न विकिरण युनिट्स आणि घटक योजनेअंतर्गत १०० अन्न चाचणी प्रयोगशाळा बांधण्यासाठी वापरली जाणार आहे. तसेच च्या विविध घटक योजनांअंतर्गत प्रकल्पांसाठी ९२० कोटी रुपये वापरले जाणार आहेत.

--------

### जायकवाडी धरणातून ९

धरणात १ जून रोजी २९ टक्के पाणीसाठा होता, जो आता वाढून ९०.२९ टक्क्यांवर पोहोचला आहे. नाशिक आणि अहमदनगरमधून आतापर्यंत ५०.४५ टीएमसी पाणी जायकवाडी धरणात दाखल झाले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि बीड या जिल्ह्यांमध्ये कमी पावसामुळे डाव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले होते. मात्र, अवघ्या आठवड्याभरात पाऊस पडल्याने डाव्या कालव्याचे पाणी बंद करण्यात आले. गेल्या वर्षी, ९ सप्टेंबर २०२४ रोजी जायकवाडी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता.

---------

### ज्ञानेश्वरी मुडेंनी मुख्यमंत्र्यांची

या प्रकरणात कोणीही दोषी असला तरी त्याला सोडले जाणार नाही, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या हत्येप्रकरणी चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांसोबतच्या भेटीची माहिती देताना सांगितले, मी गेल्या २१ महिन्यांतील या प्रकरणाचा तपशील मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. माझे म्हणणे ऐकून मुख्यमंत्री भावनिक झाले. त्यांनी कोणत्याही दोषीला सोडणार नाही, असा शब्द दिला. पुढे त्या म्हणाल्या, ‘‘महादेव मुंडे हत्याप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश दिले आणि आरोपींना अटक करण्याचे निर्देश दिले. त्यांनी तातडीने बीडच्या पोलीस अधीक्षकांना फोन करून या प्रकरणात कारवाई करण्याचे सांगितले. आता पंकज कुमावत यांच्या नेतृत्वात ही एसआयटी तपास करणार आहे.

-----

### बीडमध्ये आज सर्वपक्षीय

पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. परळी येथील व्यवसायिक महादेव मुंडे यांची हत्या झाल्यानंतरही यातील आरोपींना अटक करण्यात आले नाही. हे प्रकरण उजेडात आल्यानंतर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आंदोलन केले. त्यानंतर त्यांनी विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तरीही महादेव मुंडे यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे त्यांना न्याय मिळावा यासाठी बीडमध्ये १ ऑगस्ट रोजी रामकृष्ण लॉन्स येथे दुपारी १२ वा. मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वपक्षीय बैठक होणार आहे.

---------

### माजलगावमध्ये एकाच

तोडून दुकानातील गल्ल्यांमध्ये असणारे १८ हजार कॅश लांबवली.मिर्झा अल्ताफ हुसेन बेग यांच्या किसान वर्कशॉप मोटर रिवायडींग दुकानाचे शटर तोडून जुन्या पाण्याच्या तीन मोटर मिर्झा अल्ताफ हुसेन बेग मोटर रिपेरिंग दुकान तीन जुन्या मोटर लंपास केल्या.असा अज्ञात चोरट्याने तीन दुकानातील जवळपास ५० हजार लंपास केला आहे.चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्या कैद आहेत.माजलगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.दरम्यान पोलिसांकडून अज्ञात चोरट्या विरोधात तपास मोहीम सुरू आह

---------------

### परळीसाठी तीन नायब

कार्यालयातील नायब तहसीलदार पदे रिक्त होती. परिणामी, नागरिकांच्या महसूल व निवडणूक संबंधित कामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. ही रिक्त पदे भरल्यामुळे आता कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडले जाणार आहे. या नियुक्त्यांमुळे तालुक्यातील प्रशासकीय कामांना चालना मिळणार असून, या निर्णयाबद्दल माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

--------------

### कोकाटेंचे कृषी खाते दत्ता

खाते देण्याचे बैठकीत ठरले असल्याचे म्हटले जात आहे.

**धनंजय मुंडे यांच्याकडे इतर मंत्र्यांचे खाते देणार?**

मंत्रिपदासाठी धनंजय मुंडे लॉबिंग करत असल्याचे दिसत असून दुसरीकडे त्यांचे विरोधक मात्र त्यांना मंत्रीपद मिळू नये यासाठी डावपेच आखत असल्याचे दिसते. धनंजय मुंडेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दि. ३० व ३१ जुलै रोजी २ वेळा भेट घेतली. मुंडेंना कृषी खात्यातील घोटाळ्यांच्या आरोपामध्ये क्लिन चिट मिळाल्यानंतर अजित पवारांनी सुध्दा मुंडेंना मंत्रिमंडळात घेण्याचे सुतोवाच केले होते. त्या पार्श्वभुमीवर या हालचाली सुरु असल्याचे दिसते. तसेच मंत्रीमंडळात समावेश झाल्यास मुंडेंकडे इतर मंत्र्यांकडे असलेले अतिरिक्त खाते देण्यात येणार असल्याचे समजते.

--------

### केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या

ही वाढ ऑक्टोबर २०२५ पर्यंत कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होऊ शकते. ही वाढ सणासुदीच्या काळापूर्वी कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरेल. असे असले तरी याबाबत अद्याप सरकारकडून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.

**तुमच्या पगारात किती फरक पडेल?**

समजा, एखाद्या कर्मचाऱ्याचा मूळ पगार २५,००० रुपये आहे. सध्या त्याला ५५ टक्के म्हणजेच १३,७५० रुपये मिळतात. जर ५८ टक्क्यांपर्यंत वाढला, तर तो १४,५०० रुपये इतका होईल. याचा अर्थ, पगारात ७५० रुपयांची वाढ होईल. हा भत्ता महागाईचा प्रभाव कमी करण्यासाठी दिला जातो आणि याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांच्या पगारावर होतो.

-----------

### मालेगाव बॉम्बस्फोट: आरोपींची

पोलिसांकडून मज्जाव करण्यात आला. त्यावरून संघटना आक्रमक झाल्या होत्या. जल्लोष करतेवेळी फटाके फोडण्याचा प्रयत्न करत असताना पोलीस आणि हिंदु संघटना कार्यकर्ते यांच्यात वाद पाहायला मिळाला. आतंकवाद भगवा न कभी था, ना है, ना कभी रहेगा, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात दिली आहे. तर भगवा दहशतवाद कोणी आणला? तत्कालीन सरकारने हा शब्द आणला. हिंदू हा सहिष्णू असतो. आजच्या न्यायालयाच्या निकालाने त्यांना दिलेली ही सणसणीत चपराक आहे. न्याय उशीरा मिळाला आहे. पण ठीक आहे, न्यायदेवतेवर आमचा विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

----------------

### सरकारी नौकरीत असलेल्या

लाभ पुन्हा दिला. अजूनही अशा महिला ज्या सरकारी नोकरीमध्ये असून देखील या योजनेचा लाभ घेतात त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे, त्यांच्याकडून घेतलेला लाभ हा वसूल केला जाणार आहे, अशी घोषणा यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी केली आहे. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, राज्य शासनाने ही योजना आणली याचे नियम आणि निकष सुरुवातीपासून स्पष्ट केलेले आहेत, ज्या पात्र महिला आहेत, त्या या योजनेपासून केव्हाही वंचित राहणार नाहीत, मात्र ज्या महिला चुकीच्या पद्धतीने या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहे यांच्यावर शासन योग्य ती कारवाई करणार आहे. लाडकी बहीण योजना सुरू केल्यापासून या योजनेवर सर्वांचे लक्ष आहे, असे तटकरे यांनी म्हटले आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजना पुढे चालू ठेवण्याचा आमचा उद्देश असून ही योजना कधीही बंद होऊ देणार नाही, असेही यावेळी आदिती तटकरे यांनी म्हटले आहे.

----------

### वयोवृद्ध आईसाठी दरमहा भत्ता

विविध तारखांना सुनावण्या पार पडल्या. अंतिम सुनावणी १२ जून रोजी झाली. वादी व प्रतिवादी दोघांनीही लेखी आणि तोंडी स्वरूपात आपली बाजू स्पष्ट केली. साक्षीदार म्हणून वादी पक्षाकडून भाऊ आणि बहिणीचे शपथपत्र सादर करण्यात आले.सर्व बाजूंचा विचार करून जिल्हाधिकारी बीड यांनी वयोवृद्ध मातेस आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे नमूद करत उपविभागीय अधिकाऱ्यांचा आदेश कायम ठेवला आहे.

----------

### प्राण्यांसाठीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णवाहिकेचे

करणार आहे. समाजातील विविध गोशाळांमधील जखमी, आजारी गायी व इतर प्राण्यांना दवाखान्यात नेण्यासाठी हायड्रोलिक रुग्णावाहिका महत्त्वाचे ठरणार आहे. प्राणीमात्रांचे दुःख दूर करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. प्राणीमित्रांची सेवा हेच मुख्य ध्येय ठेवून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा पशु संवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. समस्त महाजन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून प्राणी कल्याण, पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवा क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेकडून मोफत प्राणी उपचार, आहार वाटप, वृक्षारोपण, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत अशी विविध कार्ये नियमितपणे केली जात आहेत. संस्थेच्या वतीने आतापर्यंत गोमाता व इतर अशा ९२,५०० जखमी प्राण्यांवर मागील ३६ महिन्यांत उपचार करण्यात आले आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ०१ ऑगस्ट २०२५







दिंद्रुड:-श्री.शार्दूलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ माजलगाव, इंदिरा गांधी कन्या विद्यालय दिंद्रूड चे मुख्याध्यापक श्री. बोचरे ए. व्ही.सर हे सेवानिवृत झाले असता खोलेश्वर परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात...

### जनाबाई तावरे पाटील यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील खानापूर येथील जनाबाई रावसाहेब तावरे पाटील यांचे सोमवार दि २८ जूलै रोजी सकाळी ९.३० वाजता वयाच्या ८५ वर्षी अल्पशा आजाराने अहिल्यानगर येथे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर खानापूर येथील पाटील वस्ती वरील त्यांच्या शेतात सोमवारी दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी माजी. आमदार साहेबरावजी दरेकर नाना, जि.प. सदस्य .सतीश आबा शिंदे, युवा नेते श्याम भैय्या धस,ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे गुरुजी, ह .भ. प. शिवाजी महाराज कोकणे, ह .भ .प .भीमराव महाराज गायकवाड, ह .भ .प. गोविंद महाराज पवार यांनी श्रद्धांजली वाहिली याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रा.प. सदस्य. खानापूर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.खानापूर गावचे पोलीस पाटील प्रकाश रावसाहेब तावरे पाटील.व विजय रावसाहेब तावरे पाटील यांच्या मातोश्री होत्या. तर युवा उद्योजक प्रेमकुमार तावरे पाटील यांच्या आजी होत्या.



### आढाव, गायकवाड, जाधव यांची विद्युत सहायक पदावर निवड

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे खोलेश्वर मल्टीस्टेट च्या वतीने महावितरण विभागात विद्युत सहायक पदावर नुकतीच यशस्वी निवड झाल्याबद्दल आढाव कृष्णा तात्याभाऊ , गायकवाड गणेश बालासाहेब व जाधव अशोक शिवाजी यांचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. त्यांच्या या यशस्वी वाटचालीचा गौरव करण्यासाठी आयोजित सत्कार समारंभात खोलेश्वर संस्थेचे संचालक मा. सुखदेव घुले , सर्व कर्मचारी.तसेच संस्थेचे सभासद आदी मान्यवर उपस्थित होते. या यशस्वी तरुणांनी दाखवलेली मेहनत, चिकाटी आणि निष्ठा खरंच कौतुकास्पद असून त्यांचा हा यशप्रवास इतर युवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. खोलेश्वर मल्टीस्टेट परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा!

### पोस्ट कार्यालयातील व्यवहार ४ ऑगस्टपर्यंत बंद

**जालना । प्रतिनिधी**

टपाल विभागातील पुढील पिढीतील आयटी २.० ॲप्लिकेशनची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. प्रगत डिजीटल प्लॅटफार्मवर एक अखंड आणि सुरक्षित संक्रमण सक्षम करण्यासाठी दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी नियोजित डाऊनटाईम करण्यात आला आहे. त्यामुळे दि.१ ते ४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत कोणत्याही पोस्ट कार्यालयात कोणतेही आर्थिक, पत्रव्यवहार केले जाणार नाहीत. होणाऱ्या गैरसोयीबद्दल वाईट वाटतेय परंतू नागरिकांना चांगल्या, जलद आणि अधिक डिजीटली सक्षम सेवा देण्याच्या हितासाठी महत्वाचे आहे. असे अधिक्षक डाकघर, परभणी विभाग यांनी कळविले आहे.

# सांडरवन -लिंबारुई पिंपळादेवीच्या ३ कोटीच्या रस्त्याची दुरावस्था

## रस्ता हाताने उखडू लागला, फडणवीस साहेब गुत्तेदाराची व अभियंत्यांची राष्ट्रपती पुरस्कारासाठी शिफारस करा

घाटसावळी प्रतिनिधी

सांडरवन लिंबारुई पिंपळादेवी हा ३ कोटीचा रस्ता गेल्या काही दिवसांपूर्वी म्हणजे ३ महिन्या पूर्वी राजकमल कन्स्ट्रक्शन यांनी हा रस्ता केला होता हा अतिशय निकृष्ट म्हणजे निकृष्टतेचा कळस म्हणावा लागेल इतका खराब रस्ता झालेला असतांना देखील संबंधित अभियंता यांचे यावर कसलेही लक्ष नव्हते म्हणजे उंटावरूनच शेळ्या हकण्याचे काम करत असतील हे सांगण्याची गरज नाही ३ कोटींचा रस्ता असा भंगार करून मोकळे झालेल्या राजकमल वाल्याचा आणि संबंधित अभियंता यांचा मुख्यमंत्री



साहेबांनी राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात यावे म्हणून शिफारस केली तरी कमीच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही .

सांडरवन लिंबारुई पिंपळादेवी हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत ६ किमी अंतराच्या रस्त्याचे काम असून या कामासाठी २ कोटी ९७ लाख ६६ हजार इतका निधी मंजूर करण्यात आला होता आणि याचे काम बीड येथील राजकमल कन्स्ट्रक्शन बीड यांना मिळाले होते हा रस्ता दर्जेदार होईल अशी अपेक्षा नागरिकांना होती मात्र हे तीन महिन्यातच पितळ उघडे पडले आणि ३ कोटी खड्ड्यात गेले असे म्हणण्याची नामुष्की जनतेवर आली या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून अक्षरशः हा रस्ता हाताने देखील उखरू लागला इतक्या निकृष्ट दर्जाचा रस्ता हा झाला असून याला जबाबदार संबंधित गुत्तेदार आणि अभियंता असून या काम सुरू असताना हे अभियंता नेमके कुठे होते की उंटावरून शेळ्या हाकत होते हेच कळेना ,या कामाची चौकशी करून संबंधित अभियंता यांना निलंबित केले पाहिजे आणि कन्स्ट्रक्शन ला काळ्या यादीत टाकले पाहिजे अशी मागणी केली जात आहे .

# मुलीस फूस लावून पळवणारे दोघे पोलीसांच्या ताब्यात

**तलवाडा । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील रोहितळ येथील अल्पवयीन मुलीला फुस पळून नेणाऱ्या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता याप्रकरणी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभाग्य पोलीस अधिकारी नीरज राजगुरू,सपोनि मनोज निलंगेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपींना तलवाडा पोलीसांनी शिताफीने पकडण्यात यश मिळवले आहे.**

आरोपी गोवर्धन यलदाळे व सतीश उर्फ मल्ल्या माळोदे या दोन आरोपींनी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवले होते. या प्रकरणी तलवाडा पोलीसांनी सलग दीड महिन्यापासून कसून तपास करत पुणे येथे दोन वेळा तपास कामी गेले व आळंदी येथे गेले,









नासिक येथे गेले परंतु आरोपी मिळाला नाही,आरोपींचा शोधा शोध घेतला. अखेर तांत्रिक माहितीचा उपयोग, गुप्त बातम्या आणि पोलीसांची चिकाटी याच्या आधारे आरोपींच्या तलवाडा पोलिसांनी अखेर नासिक येथुन शिंदे पळसे याठिकाणी हुन राहात्या घरी हुन आरोपीच्या मुसक्या आवडल्या आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर , उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू सहायक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हि कारवाई उपनिरीक्षक शाम गायकवाड, पोह. हनुमान जावळे पोअं. विकास थोरात, यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल सर्व नागरिकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. व खाकी वर्दीतील माणुसकी व कायदा न्याय मिळवून देणारे खरे ठरले आहे. गुन्हे गारामध्ये भितिचे वातावरण निर्माण झाले असल्याचे दिसून येत आहे. फुस लावून प्रकरणी गुन्ह्याचा तपास तलवाडा पोलिसांनी वर्ग करून पिंक पथक कडे गुन्हा देण्यात आला असल्याची माहिती दिली आहे.

# जमीन खरेदी-विक्री प्रकरणात फसवणूक झालेल्या नागरिकांनी संपर्क साधावा - डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी)

जमीन किंवा प्लॉट खरेदी - विक्री प्रकरणात फसवणूक झालेल्या नागरिकांनी त्वरित योग्य त्या कागदपत्र व पुराव्यांसकट माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

अंबाजोगाई व परिसरात गेल्या काही वर्षांमध्ये जमिनीच्या प्लॉटच्या मागणीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे तसेच जमिनीच्या प्लॉटच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत.सर्वसामान्य जनतेच्या मनात आपलं एक हक्काचं घर असावं, ते स्वस्तात मिळाव या मानसिकतेचा फायदा घेऊन काही बोगस दलालांनी, सर्वसामान्य माणसाच्या या मानसिकतेचा फायदा घेऊन अत्यल्प दरामध्ये जमिनी प्लॉट तुम्हाला खरेदी देतो करून देतो असे सांगून अनेक सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केलेली आहे. यामध्ये एकाच प्लॉटची अनेक जणांना विक्री केली आहे. काही ठिकाणी प्लॉट मालकांनीच एजंट लोकांना हाताशी धरून त्यांच्या नांवे वेगवेगळ्या एजंट मार्फत त्यांच्या प्लॉटच्या अनेक जणांकडून इसार घेतलेला आहे व लोकांची फसवणूक केलेली आहे. रजिस्ट्री ऑफिसमध्ये ही एकाच प्लॉटच्या दोन - दोन रजिस्ट्री झालेले आहेत तसे पुरावे माझ्याकडे आलेले आहेत हे सर्व पुरावे घेऊन लवकरच आता बीड चेक कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना भेटणार असल्याचे डॉ.इंगोले यांनी यावेळी जाहीर केले. बीड पोलीस कार्यालयातर्फे अंबाजोगाई उपविभाग येथे जनसंवाद बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये अंबाजोगाईचे माजी शिक्षण सभापती तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेश इंगोले यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेबांना अंबाजोगाई मध्ये जमीन व प्लॉट विक्री खरेदी संदर्भात अनेक बोगस रजिस्ट्री होत आहेत. एकाच प्लॉटची अनेक जणांना विक्री करून फसवणूक होत आहे. यामध्ये अनेक टोळ्यांचे लोक एकत्र येऊन सर्वसामान्य लोकांना फसवत आहेत.


## पान ६ वरून...


### वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या

१ लाख १९ हजार ४०० रुपये, नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २२० वाहनावर कारवाई करून २ लाख १६ हजार ३०० रुपये,युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०८ वाहनावर कारवाई करून १ लाख ७७ हजार २५० रुपये, माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७८७ वाहनावर कारवाई करून ११ लाख ६० हजार १०० रुपये, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६३ वाहनावर कारवाई करू ८१ हजार ९०० रुपये, सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३३३ वाहनावर कारवाई करून १ लाख ३ हजार ९५० रुपये, दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत २३० वाहनावर कारवाई करून ८३ हजार ७५० रुपये, वडवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७८५ वाहनावर कारवाई करून ४ लाख ७७ हजार ९०० रुपये, अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७३५ वाहनावर कारवाई करून ३ लाख ६७ हजार ९०० रुपये, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५५६ वाहनावर कारवाई करून ३ लाख ३३ हजार १०० रुपये, परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ६११ वाहनावर कारवाई करून २ लाख ८५ हजार ५० रुपये, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४९९ वाहनावर कारवाई करून १ लाख ५६ हजार ८५० रुपये, संभाजीनगर परळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८५८ वाहनावर कारवाई करून १ लाख १ हजार ८५० रुपये, बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१३ वाहनावर कारवाई करून १ लाख ९ हजार ५५० रुपये, आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३९० वाहनावर कारवाई करून २ लाख ५९ हजार ९०० रुपये, पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२७ वाहनावर कारवाई करून १ लाख ४ हजार २५० रुपये, शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३४३ वाहनावर कारवाई करून १ लाख ५९ हजार ६०० रुपये, अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १७५ वाहनावर कारवाई करून १ लाख २७ हजार ८५० रुपये, तर अंमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४० वाहनावर कारवाई करून ४४ हजार १५० रुपये दंड वसूल केला. जिल्हा वाहतूक शाखा आणि पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या एकूण कारवाई मध्ये ३३ हजार ३७० वाहनावर कारवाई करून २ कोटी ४१ लाख ३६ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. हा दंड मागच्या वर्षीच्या तुलनेत १ कोटी ५५ लाख ८८ हजार ३५० रुपयांनी अधिक आहे. आणखी सहा महिन्याच्या काळात होणाऱ्या कारवाईमध्ये एवढाच दंड वसूल होणे अपेक्षित आहे. यावर्षी जिल्हा वाहतूक शाखा आणि विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये समन्वय साधून कारवाई झाल्याने तर काही ठिकाणी स्वतः जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अंबाजोगाई, परळी, माजलगाव सारख्या शहरांमध्ये स्वतः जाऊन कारवाई केल्याने दंड वसुलीमध्ये वाढ झाली आहे .

### मनोज जरांगे, स्व.महादेव मुंडे

मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नसून आता स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणात न्यायासाठी ज्याप्रकारे आंदोलन केले होते त्याचप्रकारे आंदोलन उभे करावे लागणार आहे. या अनुषंगाने आज बीड दुपारी १२ वाजता रामकृष्ण लॉन्स येथे संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वधर्मीय, सर्वजातीय, सर्वपक्षीय बैठक होणार आहे. स्व.महादेव मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी या बैठकीस सर्व समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मंत्री पंकजा मुंडेंच्या

मजूर महिलांच्या आरोग्याची तपासणी,विनायक रत्नपारखी यांच्या वतीने रुग्णांना फळ वाटप आणि सर्वात शेवटी श्रावणी पहिला शनिवार निमित्त ह्या योगा योगाने महारूद्र हनुमानाची आरती व रूपाली कचरे यांच्यावतीने राम नाम जपाच्या पुस्तकांचं वाटप या सामूहिक लेखना मधून दोन लाख ३१ हजार राम जप पंकजाताई मुंडेंच्या दीर्घायुष्यासाठी करण्यात आले.या विविध कार्यक्रमास भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके,डॉ अशोक तिडके,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर (माऊली) सरवदे,दिपक मुंडे, सत्यनारायण उनवणे,ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे , कैलास खुरपे,पवन मोगरेकर, बाळासाहेब क्षीरसागर,उमेश जाधव,रामेश्वर चव्हाण,सुभाष कांबळे,संतोष जाधव,गौरी देशमुख,पूजा मुंडकर,चित्रा पाठक,अनिता अलकुंटे,शरद कचरे,दत्ता क्षिरसागर,मनोज कोरडे,नामदेव मुळे, राम शिंदे,दत्ता महाजन,नारायण मेंडके,सिद्धेश्वर राठोड,भरत जोशी, रवी गायकवाड, गंगाधरराव आगे, रामराव जाधव, विष्णू आगे,कल्याण शेप, सचिन तौर, बाळासाहेब साळवे, भारती घुबडे, कमलाकर जोशी , जीवन कोरडे, अशोक कीर्ते, नितीन डुकरे, दीपक गरड, मनमथ लांडगे, मयूर राऊत व राजेभाऊ सरवदे यांची उपस्थिती होती.

### तालुका कृषि अधिकारी

त्यावरून वेगाने कारवाई होत असे. पण या आदेशामुळे ही प्रक्रिया थांबण्याच्या मार्गावर आहे.या वर्षी पाऊस वेळेवर झाल्यामुळे पिकांची पेरणी चांगल्या प्रकारे झालेली आहे.

शेती करत असताना खते, बी बियाणे व औषधी हे चांगल्या दर्जाची व योग्य किमतीमध्ये मिळणे गरजेचे आहे. या सर्व बाबी सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी तालुका कृषी अधिकारी यांचे नियंत्रण या कृषी सेवा केंद्रांवर असणे गरजेचे आहे. असे असताना कृषी विभागाने मागील काही दिवसापासून तालुका कृषी अधिकारी यांचे अधिकार काढून घेतलेले आहेत त्यामुळे कृषी सेवा केंद्र चालकांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही व त्यामुळे त्यांच्याकडून शेतकऱ्यांची लूट करण्याचं काम चालू आहे. वाढीव दराने खतांची विक्री करणे खतांबरोबर इतर दुय्यम दर्जाचे खत घेण्यासाठी आग्रह करणे तसेच प्रमाणित नसलेला मालाची दुकानांमध्ये विक्री करणे यासारख्या बाबींमुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे. याबाबत कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

### अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने

पांडू कांबळे,राजू कांबळे,धुराजी आडागळे,अलझेंडे यांची उपस्थिती होती. मोठ्या थाटात कार्यक्रम पार पाडला. शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांच्या गायनाचा कार्यक्रमाने जन्मोत्सवाला रंगत आणली. जन्मोत्सव यशस्वी करण्यासाठी जयंती कमिटीचे अध्यक्ष विक्रम कांबळे, संयोजक रोहित भिसे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सहकोषाध्यक्ष शुभम भिसे, सिध्देश्वर कांबळे, शाम कांबळे, प्रदीप कांबळे, सुहास क्षिरसागर, मयूर कांबळे यांचेसह अनिलराधे कांबळे मित्र परिवाराच्या सदस्य, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### वाघिरा महोत्सवात रंगले

गावातील वयोवृद्ध पैलवान महादेव बांगर, सखाराम बांगर, मधुकर बांगर, यांनी उपस्थित राहून पैलवानांना बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले.


### कागदपत्रे हरवले आहेत

यशवंत संजय कुलकर्णी या नावाने असलेली ओरिजनल शालेय मार्क सिट,टिसी,व अन्य शालेय महत्वाची कागद पत्रे असलेली फाईल कडा ते अहिल्यानगर प्रवासादरम्यान गहाळ झाली आहे.

-::संपर्क::- मो.९०११०९४७३२



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/३८३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०७/०७/२०२५

### नाव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : स्वाती दत्तात्रय वाघमारे २) दत्तात्रय बंडू वाघमारे सिटी सर्व्हे नं.-१० सहन प्लॉट नं.-२० सिटी सर्व्हे नंबर -१८६६/अ/२० न.प.नि. नं.-१८-९९-२०/२ व सहन प्लॉट नं.-२१ सिटी सर्व्हे नं.-१८-६६/अ/२१ नप सिटी सर्व्हे-१८-९९-२१/२ चे हस्तांतर करणेबाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्यांद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही. वरील सदर मालमत्तेची

चतुः सिमा
पुर्व - प्लॉट नं.२१ मधील भाग
पश्चिम : प्लॉट नं.२० मधील भाग
दक्षिण : १२ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर : प्लॉट नं.१३ व १२

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१२३ दिनांक-२४/०७/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शादीया सरस्वती योव्हान साळवे रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आईच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सरस्वती येव्हान साळवे | आई | १४/०८/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# अलहुदा उर्दू हायस्कूल, येथे बेसिक मॅथ्स वर्कशॉप

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत नवनवीन उपक्रम राबविणाऱ्या नूर एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे दिनांक २८ जुलै २०२५ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ''बेसिक मॅथ्स वर्कशॉप'' चे आयोजन करण्यात आले. अडीच तास चाललेल्या या कार्यशाळेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणित विषयातील भीती दूर करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा होता.



कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून गणिततज्ञ व प्रसिद्ध ट्रेनर वकील शब्बीर शेख (धाराशिव, उस्मानाबाद) यांनी अतिशय सोप्या, प्रभावी आणि संवादात्मक पद्धतीने दहावीच्या विद्यार्थ्यांना मूलभूत गणिती संकल्पना समजावून सांगितल्या. संख्यांचे स्वरूप, गणिती सूत्रांचा वापर, परीक्षेतील तंत्र, तसेच वेळेचे नियोजन या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. उपस्थित विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला आणि त्यांचे समाधानही व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक डॉ. सिराज खान यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांचे गणितातील मूलभूत आकलन बळकट व्हावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. अशा उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही त्यांच्या शैक्षणिक भवितव्यास आधार देण्याचा प्रयत्न करतो.''कार्यशाळेच्या प्रारंभी वकील शेख यांचे फूल देऊन औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन परीक्षा प्रमुख शेख मोईजुद्दीन यांनी केले. त्यांनी सर्व उपस्थितांचे, विशेषतः वकील शब्बीर शेख सरांचे आभार मानले की,''त्यांच्या प्रेरणादायी आणि समर्पित मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना गणित विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला.''शाळेतील दहावीचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थ्यांनी स्वतः अनुभव सांगत वकील सरांच्या शिकवणीचे कौतुक केले. काही विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ''आम्हाला आता गणितात भीती वाटत नाही, उलट सोप्या पद्धतीने शिकवले तर गणित खूपच रंजक वाटते.'' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस निश्चितच दिशा देणारा ठरेल, अशी सर्वांची भावना होती.

# युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने २ ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनाचे आयोजन


**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने अंबाजोगाईत शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनात विविध विषयांवर मौलिक चिंतन, चर्चा होणार आहे. तरी या सम्मेलनात बीड जिल्ह्यातील मूलनिवासी समाजाने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन गोविंद सोन्नर (राज्य महासचिव, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, महाराष्ट्र) यांनी केले आहे.**

युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, बीड यांच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राजमाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष, जोशी वतन बिल, आरक्षण दिन, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि दुसरे महाराष्ट्र राज्य अधिवेशनच्या तयारी अंतर्गत - अंबाजोगाई शहरात शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी वेळ : सायंकाळी ६ ते ९.३० वाजेपर्यंत पत्रकार भवन, नगरपरिषद, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी विशेष जिल्हा सम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. सम्मेलनाचे उद्घाटक म्हणून ॲड.किशोर गिरवलकर (ओबीसी आंदोलनाचे वरिष्ठ मार्गदर्शक) तर अध्यक्षस्थानी कमलाकांत काळे (राष्ट्रीय अध्यक्ष, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज) हे असणार आहेत. यावेळी अखिल खतीब (जमियत-ए-उलेमा मराठवाडा संघटक), रामकिसन मस्के (ज्येष्ठ मार्गदर्शक, मराठा सेवा संघ, बीड), इंजि.प्रभाकर कांबळे (आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक), भगवान गडदे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद पतसंस्था, अंबाजोगाई.), डॉ.योगेश सुरवसे (ज्येष्ठ अधिव्याख्याता, डायट, अंबाजोगाई), रवी वत्सला वामन आडे (प्रसिद्धीप्रमुख, गोर सेना), मधुकर सुरवसे (तालुकाध्यक्ष, नाभिक महामंडळ, अंबाजोगाई.), बिबिषण चाटे (वंचित बहुजन युवा, जिल्हा महासचिव, बीड.), नवनाथ चौरे (अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव समिती, अंबाजोगाई), अमोल काळे (ज्येष्ठ शिक्षक, गेवराई), लक्ष्मण वैराळ (बहुजन आंदोलन अभ्यासक, परळी) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी पुढील विषयांवर मौलिक चिंतन आणि चर्चा होणार आहे. विषय - १) जाती जनगणना, एनपीआर आणि अनुसूचित जाती - जनजाती आरक्षणातील उपवर्गीकरण शासक वर्गाची भूमिका - एक गंभीर विश्लेषण, २) एनपीआर हीच खरी एनआरसी !, आणि ३) स्वर्णिम भारताच्या पुनर्निर्मितीमध्ये विद्यार्थी, युवा, महिला आणि बुद्धिजीवी वर्गाची भूमिका अर्थात मूलनिवासी बहुजन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणा शिवाय ब्राह्मणी धार्मिक ध्रुवीकरणाचा मुकाबला करता येणार नाही. असे विषय आहेत. तरी बीड जिल्ह्यातील मूलनिवासी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर, विद्यार्थी, युवा, महिला आणि बुद्धिजीवी वर्गाने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन निवेदक : युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रक्षाबंधनापूर्वी ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार २० हजार ५०० कोटी रुपये

रक्षाबंधनापूर्वी केंद्र सरकार शेतकऱ्यांना मोठी भेट देणार आहे. सरकार पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार आहे. देशातील तब्बल ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार ५०० कोटी रुपयांची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहेत. कृषी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पीएम-किसानचा पुढील हप्ता २ ऑगस्ट रोजी जारी केला जाईल. यानुसार प्रत्येक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रुपये होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २ ऑगस्ट रोजी उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे २० हजार ५०० कोटी रुपयांच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा २० वा हप्ता जारी करतील. याचा फायदा देशभरातील ९.७ कोटी शेतकऱ्यांना होईल. सरकारने २०१९ मध्ये ही मोठी डीबीटी योजना सुरू केली. आतापर्यंत या कार्यक्रमांतर्गत १९ हप्त्यांद्वारे ३.६९ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. कृषी मंत्रालयाने सांगितले की, पीएम-किसानचा पुढील हप्ता २ ऑगस्ट रोजी जारी केला जाईल. २० व्या हप्त्यात सुमारे २० हजार ५०० कोटी रुपयांची रक्कम ९.७ कोटी शेतकऱ्यांना हस्तांतरित केली जाईल.



पंतप्रधान त्यांच्या संसदीय मतदारसंघ वाराणसीमध्ये आयोजित एका विशेष कार्यक्रमादरम्यान हा हप्ता जारी करतील. या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्लीतील कृषी भवन येथे एक पूर्वतयारी बैठक घेतली. कृषी सचिव देवेश चतुर्वेदी, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. एम.एल. जाट आणि कृषी मंत्रालयाचे इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

काय आहे पीएम-किसान योजना?

पीएम-किसान योजनेअंतर्गत, पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये तीन समान हप्त्यांमध्ये मिळतात जे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. या उपक्रमाचा उद्देश शेतीयोग्य जमीन असलेल्या लहान आणि सीमांत शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत प्रदान करणे आहे. २० वा हप्ता मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. तसेच, त्यांचा आधार त्यांच्या बँक खात्याशी जोडला गेला आहे आणि जमिनीच्या अचूक नोंदी ठेवल्या आहेत याची खात्री करावी लागते. ही योजना सरकारच्या प्रमुख कल्याणकारी उपक्रमांपैकी एक म्हणून उदयास आली आहे. ग्रामीण भारतातील शेतकरी कुटुंबांना ती महत्त्वपूर्ण आर्थिक मदत देते.

यादीत तुमचं नाव कसं शोधाल? : जमिनीच्या तपशीलातील त्रुटींमुळे अनेक लोकांना पेमेंटमध्ये विलंब झाला आहे. सर्वात सामान्य समस्या म्हणजे राज्य किंवा जिल्ह्याची चुकीची नोंद. लाभार्थी पीएम-किसान पोर्टलवरील राज्य हस्तांतरण विनंती पर्याय वापरून किंवा कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) ला भेट देऊन या चुका दुरुस्त करू शकतात. शेतकरी त्यांच्या पेमेंटची स्थिती तपासू शकतात, तपशील अपडेट करू शकतात किंवा लाभार्थी यादीत त्यांचे नाव पडताळू शकतात

हेल्पलाइन नंबर काय आहे?

पीएम किसानचा २० वा हप्ता मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी अनिवार्य आहे. त्याशिवाय कोणताही निधी जमा होणार नाही. २०१९ मध्ये सुरू झालेली पीएम-किसान ही भारतातील सर्वात मोठ्या थेट लाभ हस्तांतरण योजनांपैकी एक आहे. ती कोट्यवधी लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना समाविष्ट करते. समस्यांना तोंड देणारे शेतकरी मदतीसाठी पीएम-किसान हेल्पलाइन क्रमांक १५५२६१ किंवा ०११-२४३००६०६ वर कॉल करू शकतात.

## 'कांकरेज गाय' दूध आणि शेतीकामासाठी महत्वाची

काही गायीच्या जाती एवढ्या लोभस असतात की बघताक्षणीच त्या आकर्षित करतात. अशीच गायीची एक जात म्हणजे 'कांकरेज गाय'. दूध उत्पादन व शेतकाम अशा दुहेरी कामासाठी या जातीची गाय आणि बैल उपयुक्त ठरतो. जाणून घेऊ या जातीविषयी अधिक माहिती. या जातीच्या गायी प्रामुख्याने गुजरातच्या कच्छ रण आणि राजस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात.

शारीरिक वैशिष्ट्ये : या गायीचा रंग सिल्व्हर राखाडी किंवा स्टील राखाडी असतो. त्यांची शिंगे लांब आणि दिसायला मजबूत, तीक्ष्ण आणि वीणेच्या आकाराची असतात, जी कोणालाही सहजपणे दुखवू शकतात. या गायीची उंची सुमारे १२५ सेमी आहे, तर बैलांची उंची १५८ सेमी आहे. कांकरेज गायीचे वजन ३२० ते ३७० किलो पर्यंत असते. पूर्ण वाढ झालेल्या बैलाचे वजन ५०० ते ५५० किलो असते.

प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय सुमारे ३० ते ३६ महिने एवढे असते. या गायींचा दूध देण्याचा कालावधी



२७० ते ३०० दिवस असून, एका वेतात १७५० ते १८०० लिटर दूध देतात. दिवसाकाठी सर्वसाधारण ६ ते ७ लिटर दूध सहज देतात. या गायीचे सरासरी आयुष्य २० ते २२ वर्ष असते.

इतर वैशिष्ट्ये : भारतीय गायीमधील प्रथम बघताचक्षणी प्रेमात पडावे असा लोभस गोवंश म्हणजे कांकरेज गोवंश होय. ह्या गायीने त्याच्या अंगच्या गुणवत्तेने परदेशीयांना सुद्धा संशोधन करण्यास भाग पाडले आहे. आर्यांनी ज्यावेळी आक्रमण केले त्यावेळी त्यांच्या बरोबर असलेला गोवंश म्हणून या गायीची नोंद आहे. कमी पावसाच्या प्रदेशात निकृष्ट अन्नावर पोषण होऊन देखील उत्तम गुणवत्ता सिद्ध करणे हे या गायीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. सरकारने या गायीचे महत्त्व जाणून पोस्टाचे रु. ३/- चे टपालाचे तिकीट काढले आहे.

## कुक्कुटपालनात गादी पद्धतीने पक्ष्यांचे संगोपन

कुक्कुटपालनात पावसाळ्यात पक्ष्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कोंबड्यांना पावसाळ्यात विविध आजार होतात. व्यवस्थापनात योग्य वेळी, योग्य ते बदल न केल्यास, त्याचा परिणाम कोंबड्यांचे आरोग्य आणि उत्पादनावर होतो. पावसाळ्यात बैठक व्यवस्थेची व स्वच्छतेची कशी घ्याल काळजी गादी पद्धतीने संगोपन करण्यात येणाऱ्या पक्षीगृहात पक्षांना बसण्यासाठी उंच प्लॅटफॉर्म असावेत. त्यामुळे जमिनीतील ओलाव्यापासून पक्षांचे संरक्षण होईल. तसेच त्यांच्या पायांना इजा होणार नाही आणि त्यास संसर्गही होणार नाही. पक्षांच्या गर्दी करण्यामुळे, छताच्या गळतीमुळे तसेच हगवण या कारणांमुळे पक्षीगृहातील गादीचे तूस ओले होण्याची शक्यता असते.तसेच पक्षीगृहातील गाद्यांचे पेंड पडू शकते. त्यामुळे पक्षांच्या पायांना जखमा होण्याची शक्यता असते. यासाठी पक्षीगृहातील पक्षांची संख्या नियंत्रित ठेवावी.

पक्षाच्या गादीचा सामू ७.० च्या खाली राखल्यास अमोनिया वायू निर्मिती कमी होते. हा सामू ८.० च्या वर गेल्यास गादीचे लिटर मध्ये सुपर फॉस्फेट मिसळता येईल (१.०९ कि.ग्रॅ. प्रती १०.५ वर्ग फुटासाठी) ज्यामुळे अमोनिया वायू कमी प्रमाणात उत्पन्न होईल. पक्षांचे लसीकरण वेळापत्रकानुसार करण्यात यावे. पक्षांना



जंतनाशके/कृमीनाशके औषधी द्यावीत.

पक्षीगृहात माशांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी पक्षीगृहाची नियमित स्वच्छता करावी. वातावरणातील तापमान सरारारी तापमानापेक्षा कमी असल्यास पक्षीगृहात तापमान उबदार रहावे यासाठी उष्णतेची सोय करावी. दिवस लवकर मावळणे किंवा ढगाळ वातावरणामुळे लवकर अंधार होणे या बाबीमुळे अंडी उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो, यासाठी १२ ते १४ तासापर्यंत कृत्रिम प्रकाश उपलब्ध करावा जेणेकरून अंडी उत्पादन सुरळीत राहील. पावसाळ्यात परसातील कुक्कुट पालनाद्वारे संगोपन करण्यात येणाऱ्या कोंबड्या खुडुक होण्याची शक्यता असते. त्यासाठी अशा कोंबड्याखाली प्रति कोंबडी १२ ते १५ अंडी उबवणुकीसाठी ठेवावीत. परसातील कुक्कुटपक्षी पावसामुळे साचलेल्या पाण्यात वावरल्यामुळे पायास चिखल लागू शकतो. या चिखलाद्वारे पक्षीगृहात, खुराड्यात रोगजंतुंचे संक्रमण होऊ शकते. यासाठी पक्ष्यांना बाहेर सोडल्यास पक्षीगृहांची स्वच्छता करावी. शक्य असल्यास पावसात पक्षांना बाहेर सोडू नये. खुराड्यातचं खाद्य व पाण्याची व्यवस्था करावी. परसातील कुक्कुटपालनाद्वारे संगोपन केल्या जाणाऱ्या कोंबड्या पाऊस सुरू झाल्यास पक्षीगृहात परत येतील याची दक्षता घ्यावी. कोंबड्या आजारी असल्याची शंका आल्यास पशवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत. उघड्यावर मृत कोंबड्या टाकू नयेत तसेच मृत कोंबड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी.

# कापूस पिकातील बोंड अळी नियंत्रण

कापूस पिकातील गुलाबी बोंडअळी नेमकी काय आहे, तिचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, तिचा प्रसार कसा होतो, तिची लक्षणे काय आहे आणि बोंड अळीच्या रासायनिक नियंत्रणासाठी काय उपाय योजना आहेत याबद्दल सविस्तर माहिती असल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते. कपाशीवर मावा, तुडतुडे, फुलकिडे, बोंडअळी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी २००२ मध्ये बीटी जनुक असलेल्या वाणांचा वापर भारतामध्ये सुरू झाला परंतु बोंड अळीचा प्रादुर्भाव बीटी कपाशीवर सुद्धा दिसून येत आहे. शेतकरी मित्रांनी वेळेवर उपाययोजना केल्यास बोंड अळीचा प्रादुर्भाव पासून होणारे संभाव्य नुकसान कमी करता येईल. कापूस पिकात मुख्य ठिपक्याची बोंड आळी, अमेरिकन (हिरवी) बोंडअळी ,गुलाबी बोंड आळी या तीन बोंड अळ्यांचा प्रादुर्भाव असतो.

बोंड अळीचा प्रकार : ठिपक्याची बोंड अळी - ३० ते ६५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) अमेरिकन बोंड अळी - ४५ ते ८५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) रोटरी गुलाबी बोंड अळी - ७५ ते ११० दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी)

जीवनक्रम व ओळख : अंडी आकाराने चपटी व १ मि.मी. लांब असून रंगाने मोत्यासारखी चकचकीत पांढरी असतात व ती फुले, बोंड, देठ व कोवळ्या पानांच्या खालील बाजूस दिसून येतात. अंडी अवस्था सुमारे ३ ते ५ दिवस राहते व या पक्व झालेल्या अंड्यातून सफेद रंगाची १ मिमी. लांब व डोके तपकिरी असलेली अळी बाहेर पड़ते. पूर्ण वाढ झालेली अळी सुमारे ११ ते १३ मि.मी. लांबट असून प्रत्येक वलयावर गुलाबी पट्टा असतो व तो नंतर शरिरावर पसरतो त्याने अळीचे शरीरगुलाबी दिसते. अळी अवस्था सुमारे ८ ते २१ दिवसांच्या दरम्यान असते. कोषावस्था मध्ये अळी लालसर तपकिरी रंगाची दिसते व सुमारे ८ ते १० मि.मी. लांब असते. तसेच कोषावस्था सुमारे ६ ते २० दिवस राहते व त्यातून



पतंग बाहेर येतात. पतंगाची लांबी सुमारे ८ ते ९ मि.मी.असते व ते करड्या रंगाचे दिसतात. पतंगाच्या पुढील पंखावर काळसर पट्टे दिसतात व पाठीमागील पंख पतंगावस्था सुमारे ५ ते ३१ दिवस राहते.

प्रादुर्भावाची कारणे : देशी जातीच्या तुलनेने अमेरिकन जातींवर जास्त प्रादुर्भाव. दीर्घकाळ वाढणाऱ्या संकरित वाणाची लागवड केल्याने बोंड अळीच्या वाढीसाठी सतत पोषक वातावरण निर्माण होते. कपाशी बरोबरच भेंडी,अंबाडी,जास्वंद,ताग इत्यादी पर्यायी खाद्याची उपलब्धता असणे. कापसाच्या विविध संकरित वाणांचा फुले येण्याचा व बोंडे लागण्याचा काळ वेगवेगळा असल्याने त्यांची लागवड केल्याने कोडीच्या वाढीसाठी सतत खाद्य पुरवठा होऊन जीवनक्रमाच्या संख्येत वाढ होणे. हंगामपूर्व तसेच हंगामी कापूस लागवड केल्याने कोडींचा जीवनक्रम वर्षभर चालू राहते. बी. टी. जनुक विरहीत कपाशीच्या ओळी न लावल्यामुळे बी. टी. प्रथिनाविरुद्ध प्रतिकारक्षमता तयार होणे. जादा उत्पादनासाठी कपाशीच्या हंगामाचा कालावधी वाढविल्याने किडीस खाद्याची उपलब्धता होणे.

पिकावर असा होतो परिणाम : अंड्यातून निघालेली अळी बोंडात शिरल्यानंतर तिच्या विष्ठेने व बोंडाच्या बारीक कणांच्या सहाय्याने छिद्र बंद करते. ज्या मुळे बोंडाचे वरुन निरीक्षण केल्यानंतर सुध्दा अळीचा प्रादुर्भाव ओळखता येत नाही. या अळीचा प्रादुर्भाव बोंडा मध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. किडलेल्या पात्या गळून पडतात किंवा अशी बोंडे परिपक्व न होता च फुटतात. गुलाबी बोंडअळी सरकीचे नुकसान करते. सरकी किडलेली असल्यामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते तसेच धाग्याची लांबी व मजबूतीही कमी होते.

कपाशी गुलाबी बोंड अळी नियंत्रण : प्रति एकर ८ ते १० कामगंध सापळ्यांचा वापर करावा. त्यात सापडणारी नर पतंग गोळा करून नष्ट करावेत. गरजेनुसार वेळोवेळी कामगंध सापळ्यात ल्युअर बदलून घ्यावे. कापूस साठवण केलेल्या जागी आणि जिनिंग-प्रेसिंग मिलच्या ठिकाणी प्रकाश सापळे, कामगंध सापळे लावावेत. पुढील वर्षी शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर महिन्यात कपाशीच्या पऱ्हाट्या किंवा कपाशीचे शेतातील अवशेष नष्ट करावेत. त्यासाठी कापसाची शेवटची वेचणी झाल्यानंतर शेतात जनावरे चरण्यासाठी सोडून द्यावीत. उर्वरित शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणास मदत होते. डिसेंबरनंतर कपाशी पिकाचा खोडवा (फरदड) अनेक शेतकरी ठेवतात. जास्त पाणी दिल्याने कपाशीला पाते, फुले व बोंडे गुलाबी बोंड अळीच्या उपजीविकेसाठी कपाशी बोंडे उपलब्ध होत राहतात. परिणामी किडीची वाढ होत राहते. ही कीड बी. टी.ला प्रतिकारकता निर्माण करते म्हणून डिसेंबर ते १५ जानेवारीच्या आत पीक काढून टाकावे. किंवा खोडवा घेणे टाळावे. पीक काढणीनंतर कपाशीच्या पऱ्हाट्या शेतात किंवा शेताजवळ त्यांचा ढीग करून ठेऊ नये. पीक काढणीनंतर खोल नांगरणी करून जमीन उन्हात चांगली तापू द्यावी.

जैविक नियंत्रण : निम तेल १०,००० पीपीएम - २० मिली किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० मिली किंवा बॅसिल्लस थुरिंगींसिस ५० मिली प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक पद्धत : १) कराटे (लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ईसी) - १० मिली.

२) सुपर डी (क्लोरोपायरीफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ३) प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ४) ईएम १ (इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी) - १० मिली. ५) डेसिस १०० (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. ६) ट्रेसर (स्पिनोसॅड ४५ एससी.) - ७ मिली. ७) एम्पलिगो (क्लोरएन्ट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६०% ) - ८ मिली.

८) कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल १८.५% एस. सी) - ६ मिली. या पैकी कोणतेही कीडनाशक आलटून पालटून किडीचा प्रादुर्भाव नुसार प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : संभाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांकडे गेलेला सिंहगड नवजी बलकवडे यांनी पुन्हा स्वराज्यात आणला.
१८७४ : टंकलेखक (टाईपरायटर) पहिले व्यावसायिक टंकलेखन यंत्र (टाइपराइटर) ची विक्री सुरु झाली.
१८७९ : भारतात पोस्टकार्ड बाजारात विक्रीस उपलब्ध झाली.
१९०९ : क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने भारतमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली यांची इंपिरिअल इन्स्टिट्युटच्या 'जहांगिर हाऊस'मधे इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी गोळ्या झाडून हत्या केली.
१९१९ : कै. बाबूराव ठाकूर यांच्या 'तरुण भारत' (बेळगाव) या वृत्तपत्राची सुरूवात झाली.
१९३३ : नाट्यमन्वंतर संस्थेच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३४ : मानवी शरीराचे सर्वप्रथम छायाचित्र घेण्यात अमेरिकन डॉक्टरांना यश
१९४८ : बाजारपेठेतील व्यापार्यांचे नेतृत्त्व करणार्या 'पूना मर्चंट्स चेंबर' या संस्थेची स्थापना
१९४८ : 'कायदेआझम' मुहम्मद अली जीना यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' या पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेचे उद्घाटन झाले.
१९४९ : त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थाने एकत्र करुन 'थिरुकोची' संस्थान निर्माण करण्यात आले. याचेच पुढे केरळ राज्य बनले.
१९५५ : 'स्टेट बँक ऑफ इंडिया अ‍ॅक्ट १९५५' अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली. याआधी ही बँक इंपिरिअल बँक या नावाने ओळखली जात होती.
१९६० : रवांडा व बुरुंडी हे देश स्वतंत्र झाले.
१९६१ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार पुणे विद्यापीठाचे चौथे कुलगुरू झाले.
१९६२: सोमालिया व घाना हे देश स्वतंत्र झाले.
१९६४ : न. वि. गाडगीळ पुणे विद्यापीठाचे पाचवे कुलगुरू झाले.
१९६४ : भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली.
१९९७ : शतकातील सर्वोत्कृष्ट वेटलिफ्टर्सच्या यादीत भारताच्या कुंजरानी देवीचा समावेश करण्यात आला.
२००२ : आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालय स्थापना झाली.
२०१५ : डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.
२०१७ : देशांतील अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा म्हणून वस्तू व सेवाकर (जीएसटी) संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४६ : प्रख्यात जर्मन गणितज्ञ व तर्कशास्त्र विद्वान गाटफ्रीड विलहेल्म लाइबनिज( ) यांचा जन्मदिन.
१८८२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, कॉंग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (मृत्यू: १ जुलै १९६२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८७ : कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (मृत्यू: ? ? १९२०)
१९१३ : वसंतराव जाईक महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९७९)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील महान बासुरी वादक, संगीत दिग्दर्शक आणि थोर शास्त्रीय कलाकार पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा जन्मदिन.
१९४९ : वेंकय्या नायडू केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, भारताचे वे१३ उपराष्ट्रपती
१९६१ : कल्पना चावला भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (मृत्यू: १ फेब्रुवारी २००३)
१९६६ : उस्ताद राशिद खान रामपूर-साहसवान घराण्याचे शास्त्रीय गायक
१९६८ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत परंपरेतील रामपूर-साहसवान घराण्यातील शास्त्रीय संगीतकार उस्ताद रशीद खान यांचा जन्मदिन.
१९७३ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व समाजवादी पक्षाचे अध्यक्ष तसचं, उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री अखिलेश कुमार यादव यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (जन्म: २९ डिसेंबर १८००)
१९३८ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्हाडचे नबाब' (जन्म: २७ ऑगस्ट १८५४)
१९४१ : सर सी. वाय. चिंतामणी स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (जन्म: १० एप्रिल १८८० विजयनगरम, आंध्र प्रदेश)
१९६२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष (जन्म: १ ऑगस्ट १८८२)
१९६२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, कॉंग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (जन्म: १ जुलै १८८२ पाटणा, बिहार)
१९६९ : मुरलीधरबुवा निजामपूरकर कीर्तनकार
१९७१ : सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग (ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता, )
१९८९ : प्राचार्य ग. ह. पाटील कवी व शिक्षणतज्ञ, 'माझ्या मामाची रंगीत गाडी हो', 'देवा तुझे किती, सुंदर आकाश', 'डराव डराव, डराव डराव, का ओरडता उगाच राव' अशी त्यांची अनेक बालगीते लोकप्रिय आहेत. (जन्म:)
१९९४ : राजाभाऊ नातू दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक व नाट्य संघटक (जन्म:)
१९९९ : एम अँड एम चे संस्थापक फॉरेस्ट मार्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १९०४)

# ५९ कोटींच्या नगररोडच्या दर्जाहिन कामामुळे तरूण वकिलाचा मृत्यू

## दुचाकी –कारची धडकः तिप्पटवाडी फाट्याजवळ एकाच बाजूने वाहतूक : ४ महिन्यातच रस्ता उखडला

बीड। प्रतिनिधी

अनेक वर्षांपासून रखडलेल्या बीड – अहिल्यानगर या २४ .५ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सव्वा वर्षापुर्वी सुरूवात झाली. डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र अद्यापही काम पूर्ण झालेले नाही.विशेष म्हणजे ४ महिन्यांपूर्वी तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला काही ठिकाणी खड्डे,तडे गेल्याने,भेगा पडल्याने दुरुस्ती करण्यात येत आहे. या १५९ रूपये किंमतीच्या बेसुमार दर्जाच्या रखडलेल्या कामामुळे काल एका वकील तरुणाला आपला जीव गमवावा लागला असुन याची जबाबदारी कोणाची असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बुधवार दि.३० रात्री शहरानजीकच्या तिप्पटवाडी फाट्याजवळ हा अपघात झाला असुन वैभव महारूद्र सांगळे वय २५ वर्षे रा.उक्कडपिंप्री ता.गेवराई असे अपघातात ठार झालेल्या तरुण वकिलाचे नाव आहे.४



महिन्यापुर्वीच तयार केलेल्या रस्त्याला तडे,भेगा पडल्याने उकडलेल्या ,भेगा पडलेल्या ठिकाणी दुरुस्ती सुरू आहे. त्यासाठी एका बाजूचा रस्ता बंद केल्याने दोन्ही बाजूंची (अहिल्यानगर कडून येणारी आणि बीड कडुन जाणारी वाहने) वाहतूक एकाच बाजूने सुरू राहिली. दरम्यान दुचाकीला कारने धडक दिली.

यात गंभीर जखमी झालेल्या वैभव सांगळे या तरुणाचा मृत्यू झाला. वैभव दुचाकीवरून राजुरीकडून बीड कडे येत असताना समोरून आलेल्या कारची दुचाकीला धडक बसून हा अपघात झाला. अनेक वर्षापासून रखडलेल्या बीड – अहिल्यानगर या महामार्गाच्या २४.५ किलोमीटर रस्ता कामासाठी १५९ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय महामार्ग निधीतुन उपलब्ध झाला आहे. जून २०२४ मध्ये रस्ता कामाची सुरुवात झाली. डिसेंबर २०२४ पर्यंत काम करण्याची मुदत होती. मात्र काम संथगतीने सुरू असल्याने तीन किलोमीटर रस्ता पूर्ण झालेला नाही.

तसेच नाली व दुभाजकाचे कामही अनेक ठिकाणी अपूर्ण आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंड ठोठावुनही सुधारणा झालेली नाही. दरम्यान ४ महिन्यापूर्वी सिमेंट रस्ता बांधूनही उखडलेल्या भेगा पडलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. तब्बल १५९ कोटी रुपये खर्चून करण्यात येत असलेल्या नगररोडचे काम ४ महिन्यांपूर्वीच झालेल्या रस्ते कामाला काही ठिकाणी खड्डे तर काही ठिकाणी तडे,भेगा पडलेल्या आहेत. संबंधित प्रकरणात तक्रार केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण बीड विभाग अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात सिमेंटचा थर देताना चुकुन रेक्झिनचा एक बंच क्रांक्रीटमध्ये गेला होता तो काढताना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खड्डे पडलेलेले आहेत.खड्डे बुजविण्यात आले असुन काम दर्जेदारच झाले आहे.आठ ते दहा ठिकाणी उकडलेल्या,भेगा पडलेल्या रस्त्याच्या ठिकाणी दुरूस्तीचे काम सुरू असुन काम करताना बॅरिकेट्स व तत्सम सर्व उपाययोजना करून दिशादर्शक ही लावण्यात आले आहेत. असे म्हणत दर्जाहीन कामाला दर्जेदार कामाचे प्रशस्तिपत्र देऊन टाकत आहे. एकंदरीतच डॉ.राजेंद्र भोपळे कंत्राटदाराची पाठराखण करताना दिसुन येत आहे.

## थोडक्यात



### बाबासाहेब शिंदे यांना तालुकाध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र प्रदान

परळी। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून बाबासाहेब शिंदे यांना नियुक्त करण्यात आले असून, नुकतेच त्यांना पक्षाचे सरचिटणीस आ.रोहितदादा पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली असल्याचं जाहीर करण्यात आले आहे. यावेळी आ.संदीप भैय्या क्षीरसागर, परळी विधानसभेचे राजेभाऊ फड यांच्यासह प्रमुखांची उपस्थिती होती.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आ.रोहितदादा पवार हे मंगळवारी परळी वैजनाथ दौऱ्यावर होते. या भेटीदरम्यान त्यांनी बाबासाहेब शिंदे यांना अधिकृतपणे तालुकाध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे पत्र प्रदान केले व नव्या निवडीबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या. निवडपत्र प्रदान करतेवेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ.संदीप भैय्या क्षीरसागर, परळी विधानसभेचे नेते राजेभाऊ फड, अंकुशराव ढोबळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### ५२२ अर्जापैकी ४११ मंजूर ,३६ रद्द तर चौकशीसाठी ७५ अर्ज

अंबड। प्रतिनिधी

अभिवृद्धी पुनर्वैधता आकडेवारीची आज अंबड तहसील कार्यालयामध्ये तपासणी करण्यात आली५२२ पैकी मंजूर ४११ अर्ज वगळलेले/रद्द ३६ अर्ज पुनर्तपासणी साठी ७५ अर्ज ठेवण्यात आले. या तपासणी करणारे कर्मचारी अधिकारी सर्व मंडळ अधिकारी, तलाठी आणि कृषी सहाय्यक.मुख्य तपासणी आणि देखरेख करणारे: ६ कर्मचारी, १ नायब तहसीलदार आणि तहसीलदार विजय चव्हाण अशी टीम होती. अंबड तालुक्यात ‘अभिवृद्धी पुनर्वैधता ३० जुलै, २०२५ अंबड तहसील कार्यालयामार्फत सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यासाठी प्राप्त झालेल्या ‘अभिवृद्धी पुनर्वैधता अर्जांची तपासणी प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येत आहे. या संदर्भात, आज रोजीपर्यंतच्या कारवाईचा तपशील आम्ही सर्व माहिती प्रसिद्धीसाठी देण्यात येत आहे.या मोहिमेअंतर्गत, एकूण प्राप्त अर्जांपैकी ५२२ अर्जांची सखोल तपासणी पूर्ण झाली आहे. तपासणीअंती खालीलप्रमाणे स्थिती आहे:ए कूण मंजूर अर्ज, ४११ चुकीची वगळण्यात आलेले/रद्द अर्ज,३६ अधिक चौकशीसाठी पुनर्तपासणीत असलेले अर्ज ७५ शासनाच्या निर्देशांचे पालन करत, ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि अचूक पद्धतीने राबवली जात आहे. उर्वरित पुनर्तपासणीतील अर्जांवर लवकरच निर्णय घेतला जाईल आणि पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळेल याची खात्री आम्ही देतो. प्रशासन याकामी कटिबद्ध असून, प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाईल. अशी माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे.

### यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतनच्या नऊ विद्यार्थ्यांची निवड

बीड : म शि.प्र मंडळ संचालित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन हे विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्यासाठी नेहमीच अग्रगण्य स्थानी आहे व नवीन उपक्रम राबवून प्रयत्नशील असते. इलेक्ट्रिकल शाखेतील लाटे रामेश्वर, शिंदे अतुल ,टॉम्पे ओमकार ,झांबरे पायल, वैरागे मानसी,पठाण असीमखान, जगताप मयूर ,मोघल अफरोज,साळुंके ऋषिकेश.या विद्यार्थीची महापारेषण मध्ये विद्युत सहाय्यक पदा साठी निवड झाली आहे त्यांना ४.८ लाख एवढे पॅकेज प्रतिवर्षी भेटलेले आहे.हे पद महापारेषण कंपनीत वीज वितरण आणि पारेषण कामांसाठी आवश्यक असणारे एक महत्त्वाचे पद आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या किंवा पास झालेल्या विद्यार्थ्यांना चांगल्या पदावर नोकरी मिळाली त्या बद्दल आम्हाला अभिमान आहे व यामुळे आम्ही विद्यार्थ्यांच्या विकासकासाठी करत असलेल्या उपक्रमाचे फलित मिळाले याचा आनंद वाटत आहे.तसेच महाविद्यालयाच्या कॅम्पस व प्लेसमेंट विभागा मार्फत विद्यार्थ्यांना चांगल्या पदावर चांगल्या वेतनाच्या नोकरी मिळवण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते.निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले, टी.पी.ओ प्रमुख प्रा.धुमाळ बी.आर,विभागप्रमुख प्रा.मोरे डी.एन, प्रा.शिनगारे एस. टी, प्रा. राऊत टी. के, प्रा. कुलकर्णी एस.एस,प्रा. बहिर एस.एस आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महसूल विभागांच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा–जिल्हाधिकारी

बीड। प्रतिनिधी

राज्यभरात महसूल विभागामार्फत ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. महसूल व वन विभागाच्या कालच्या (मंगळवार, ता.२९ जुलै) शासन निर्णयानुसार हा सप्ताह विविध उपक्रमांनी बीड जिल्ह्यात साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यातील जनतेने या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. या सप्ताहादरम्यान महसूल विभागाच्या योजना, कामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

०१ ऑगस्ट: ‘‘महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताहास शुभारंभ‘‘ तसेच ‘‘महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण, ०२ ऑगस्ट: ‘‘शासकीय जागेवर सन २०११ च्या पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्याबाबत कार्यक्रम, ०३ ऑगस्ट: ‘‘पाणंद/शिवारस्थळांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, ०४ ऑगस्ट: ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान प्रत्येक मंडळानिहाय राबविणे, ०५ ऑगस्ट: ‘‘विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डीबीटी करून अनुदानाचे वाटप करणे, ०६ ऑगस्ट : ‘‘शासकीय जमिनींवरील अतिक्रमण निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासनानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेणे, ०७ ऑगस्ट: ‘‘– धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे ( प्रमाणे) धोरण पूर्वाभ्यास घेणे आणि महसूल सप्ताहाचा समारोप.

## अण्णाभाऊ साठे संगीत रजनीतून जनतेचा चळवळीला सलाम

बीड। प्रतिनिधी

जागतिक कीर्तीचे साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती बीडमध्ये सन्मानपूर्वक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी होत आहे. त्या अनुषंगाने बुधवार (ता.३०) जुलै रोजी ख्यातनाम गायिका मंजूषा शिंदे यांच्या गीतांनी सामाजिक परिवर्तनाची मशाल पेटवली त्यामध्ये जग बदल घालुनी घाव, मज सांगून गेले भीमराव, तसंच अण्णा साहित्याची खान, आणि लय बळ आलं माझ्या दुबळ्या पोरात, अशी गीते सादर करुन, शोषित-पीडितांच्या वेदनांना आवाज दिला.

बीडमध्ये साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने दि.२८ जुलैपासून दि.१ ऑगस्टपर्यंत साहित्य सम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. हा महोत्सव डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे आणि सार्वजनिक जयंती



उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून साजरा होतो आहे. ख्यातनाम गायिका मंजुषा शिंदे यांच्या प्रभावी आणि परिवर्तीय गायनातून अण्णाभाऊंच्या चळवळीच्या गीतांना नवजीवन लाभले. यावेळी गीतांनी उपस्थितांच्या अंगात चैतन्याची लहर संचारली. या गीतांतून शोषितांचे दुःख, आशा, आणि बंडखोरीची ज्योत उभी राहत होती. कार्यक्रमाचे आयोजक मार्गदर्शक अजिंक्य चांदणे, अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनील पाटोळे यांच्या प्रयत्नांतून या रजनीने लोकमनावर अण्णाभाऊंचे विचार कोरले.यावेळी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रेमलताताई चांदणे, सुशिलाताई मोराळे, अमृतलाल सारडा, अड.अविनाश गंडले, सचिन मुळूक, रामसिंग टाक, अशोक सोनवणे, यांच्यासह सामान्य जनतेने गर्दी करत रजनीला चळवळीचे रूप दिले. ही रजनी एक सांस्कृतिक जागर होती–केवळ गाणी नव्हती, तर परिवर्तनाचे मंत्र होते. अण्णाभाऊंच्या लेखणीतून साकारलेली विद्रोहाची स्फुलिंगं या गाण्यांतून पेट घेत होती.

## महाजनवाडी येथे सौर ऊर्जेच्या मोटारीची चोरी ;नेकनुर पोलिसांकडून फिर्यादीला त्रास

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीमध्ये शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा पंप, विद्युत मोटारी, रोहित्राच्या वायर इत्यादींच्या चोरीच्या घटनांमध्ये सतत वाढ होत असून, प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर महाजनवाडी येथील शेतकरी रामचंद्र घरत यांच्या शेतातील नुकत्याच बसवलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप



योजनेतील पंपाची चोरी झाली.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नेकनुर पोलिस प्रशासनाने तक्रार घेण्यास दोन दिवस टाळाटाळ करत, अखेर लिंबागणेश पोलिस चौकीत सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख यांनी तक्रार लिहून घेतली.

मात्र, यामध्ये आणखी गंभीर बाब म्हणजे पंपाची मूळ किंमत ₹६५,००० असतानाही पोलिसांनी ती केवळ ₹२ ते ₹४ हजार दाखवण्याचा आग्रह धरला. सोने दुकानातून बाहेर गेल्यावर जशी किंमत कमी होते, तशीच या पंपाची देखील झाली आहे,‘‘ असे अजब स्पष्टीकरण नेकनुर पोलिसांनी दिले, असे रामचंद्र घरत यांनी सांगितले. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

‘‘पोलिस चोरांना पकडण्याऐवजी फिर्यादीलाच संशयाच्या नजरेने पाहतात, किंमती कमी करायला लावतात, आणि दोन-दोन दिवस हेलपाटे मारायला लावतात,‘‘ असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांवर पोलिस प्रशासन नियंत्रण आणण्यात अपयशी ठरत आहे. शेतकरी उपयोगी साहित्य - मोटारी, वायर, सौर पंप चोरीला जात असतानाही नीट तपास केला जात नसल्याने चोरांचे मनोधैर्य अधिकच वाढले आहे. यामुळे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी दिला आहे.

## मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने सीमा ओस्तवाल यांचा सन्मान

बीड। प्रतिनिधी

बीड येथील गुरू आनंद प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने डॉ संजय तांदळे आणि पत्रकार आत्माराम वाव्हळ सर यांनी त्यांचा सन्मान करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. बीड शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या यादीमध्ये पहिल्या क्रमांकांनी ज्यांचा उल्लेख करावा लागेल अशा सामाजिक कार्यकर्त्या सौ सीमा ओस्तवाल मॅडम सामाजिक कामात स्वतःला झोकून देऊन आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक कार्य करत असताना दायित्व सांभाळणाऱ्या या ओस्तवाल मॅडम सातत्याने गोरगरीबांना मदत करत असतात. मागील काही वर्षापासून

शैक्षणिक क्षेत्रात अतिशय मोठ्या प्रमाणावर ग्रामीण व शहरी भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वह्या,पेन, कंपास यासह इतर शालेय साहित्याचे वाटप करतात. दरवर्षी त्या शैक्षणिक साहित्याच्या संख्येत वाढ करत आहेत. यावर्षी त्यांनी एक लाख वह्या, पेन आणि इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचं काम केले आहे. तसेच त्या सणाच्या निमित्ताने गोर गरीबांना किराणामाल देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण



करतात. सीमा ओस्तवाल मॅडम यांचा काल वाढदिवस होता. सातत्याने समाजसेवेचा वृत्त स्वीकारणाऱ्या सौ सीमाताई ओस्तवाल मॅडम यांच्या वाढदिवसाला सणासारखे स्वरूप निर्माण झाले आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून बीड शहरातील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे यांच्यासह पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणारे पत्रकार आत्माराम वाव्हळ यांनी गुरू आनंद प्रतिष्ठानच्या सौ. सिमाताई मनोज ओस्तवाल यांचा सन्मानपत्र ,चिन्ह, पुष्पगुच्छ ,शाल, श्रीफळ देऊन सन्मान करून त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा दिल्या. लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे ,लक्ष्मण चाटे आदींची उपस्थिती होती.

## मुलांच्या हक्कासाठी आम आदमी पार्टी शाळेच्या भेटीला

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये आम आदमी पार्टीच्या वतीने आम आदमी पार्टीचे सर्वे सर्वा मा. अरविंद केजरीवाल यांच्या आदेशाने व दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मा. मनीषा शिसोधिया शिक्षा मंत्री दिल्ली सरकारया यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शनास आले की भारत देशातील सरकारी शैक्षणिक व्यवस्था अतिशय बिकट आहे लहान लहान मुले शाळेची छत कोसळून भिंत कोसळून मृत्युमुखी पडत आहेत हे पाहता संपूर्ण देशांमध्ये आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हा अंतर्गत अभियान चालवण्यात येणार आहे दिनांक १/८/२०२५ ते ७/८/२५ पर्यंत जिल्हातिल /शहरातील शाळेची परिस्थिती ची माहिती मिळणे शाळेची सद्य परिस्थिती आम आदमी पार्टी च्या शिष्टमंडळास शाळेमध्ये जाऊन तेथील पाहणी करणार शासनाच्या उदासीन धोरणामुळे आपल्या राज्यातील सरकारी शाळांची दुरवस्था अनेक ठिकाणी झालेली आहे असे आम आदमी पार्टी च्या लक्षात आले आहे.



परंतु शाळेत विद्यार्थ्यांना शिकवला जाणारा शिक्षक वर्ग हा प्रमाणीकपणे कर्तव्य बजावत आहे हे कर्तव्य बजावत असताना काही सत्ताधारी लोकांच्या हास्तक्षेपामुळे शाळेसाठी आवश्यक लागणाऱ्या मुलभूत सुविधा कडे दुर्लक्ष करतांना दिसत आहे यासाठी गाव शिक्षण समितीचा व शालेय प्रशासनाचा अभाव आहे काही लोकांचे खासगी संस्थाचालक यांच्याशी गुप्त गु असल्याने सरकारी शाळेकडे गरजु लोकांचा द्रष्टीकोन बदलत चालल्या आहेत परिणामी याकडे गांभीर्याने शिक्षण प्रशासन दुर्लक्ष करतांना दिसते आहे सरकारी शाळांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून न देता पटपडताळणी, संचमान्यता शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी च्या मुद्द्यावर संबंधित शिक्षकांना शालेय योग्य प्रशिक्षण न देता आपले सरकार हे सरकारी शाळा ह्या कश्यारितिने बंद पडतिल हा हेतू सरकार ठेवून शिक्षकांना इतर विभागातील सर्वे करने, मतदार/आरोग्य यंत्रणांमध्ये गुरफटून ठेवते आहे यामुळे आपल्या जिल्ह्यातील/सर्व नगरपरिषद, शहरातील, तालुका, नगरपंचायत, ग्रामपंचायत, तांडा, वस्ती, क्षेत्रातील सरकारी शाळा ह्या बंद होताना दिसत आहेत.

## गढी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय मैत्री दिन उत्साहात साजरा

गढी। प्रतिनिधी

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मैत्री दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.महादेवी फड तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते. सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापकांच्या वतीने प्रा. डॉ.महादेवी फड यांची अर्थशास्त्र विभाग प्रमुख व प्रा.सुप्रिया डोंगरे यांची वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार कररून त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. महादेवी फड यांनी असे प्रतिपादन केले



की, आंतरराष्ट्रीय मैत्री दिन साजरा करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र सरकारे, आंतरराष्ट्रीय संघटना आणि नागरी समाज गटांना असे कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहित करते जे संस्कृतींमध्ये संवाद, एकता, परस्पर समंजसपणा आणि सलोखा वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाच्या प्रयत्नांना हातभार लावतात. हे सामाजिक संबंध वाढविण्यास मदत करते, शांती आणि समजूतदारपणा वाढवते, सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देते, सामुदायिक बंध मजबूत करते, मानसिक आरोग्य फायदे आणि इतर संस्कृतींबद्दल सामान्य जागरूकता निर्माण करते. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय मैत्री दिनाचे जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मैत्रीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि शांततेच्या संस्कृतीला चालना देण्यासाठी या वर्षी आंतरराष्ट्रीय मैत्री दिन २०२५ विविध उपक्रम आणि कार्यक्रमांसह साजरा केला जात आहे. यावेळी वाणिज्य विभागाच्या प्रा. सुप्रिया डोंगरे यांनीही आपल्या मनोगतातून आंतरराष्ट्रीय मैत्री दिनानिमित्त आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये असे प्रतिपादन केले की आंतरराष्ट्रीय मैत्री दिनाचे औचित्य साधून मानवी संबंध, सांस्कृतिक समज आणि भावनिक लवचिकता अधिक प्रगल्भ करण्यावर भर दिला जातो.मैत्री साजरी करताना, आपण सर्व परिवर्तनकारी मानवी प्रगतीच्या मुळांचा उत्सव साजरा करतो. खऱ्या अर्थाने, मैत्री हा असा पाया आहे ज्यावर शाश्वत शांतता आणि समावेशक समाज बांधले जातात. चांगले आरोग्य,सकारात्मक सामाजिक संवाद, मानसिक आणि भावनिक कल्याणात मैत्रीचे मोलाचे योगदान असते.मैत्री दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास प्रमुख प्रोफे. डॉ. राणी जाधव व आभारप्रदर्शन प्रा. शिल्पा ससाणे यांनी केले. यावेळी सांस्कृतिक विभागाचे प्रोफे. डॉ. संतोषकुमार यशवंतकर, प्रा. हिरा पोटकुले प्रा. डॉ.रमेश रिंगणे प्रोफे.डॉ. शिवलाल घुगे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जयराम ढवळे प्रा.श्रीकिसन लोणकर, विद्यार्थी विकास विभागाचे प्रोफे.डॉ.धर्मराज कटके प्रा.डॉ. रामदास खताळ यांच्यासह प्रोफे. डॉ.रामहरी फाटक, प्रोफे.डॉ. अयोध्या पवळ,प्रा.डॉ.तबस्सूम इनामदार, प्रा.डॉ बाळासाहेब सरपते,प्रा डॉ. महारुद्र गव्हाणे, विज्ञान विभागाचे प्रा.इंगोले, प्रा.अनिल गोंजारे प्रा.अजित काळे, प्रा.अमर जाधव, प्रा.शाम राऊत, , श्री. राजेंद्र जाधव, श्री.कल्याण वक्ते,श्री. मधुकर धुताडामल यांच्यासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ड्रग्ज पार्टी प्रकरणी प्रांजल खेवलकरांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी, जामीन मिळण्याचा मार्ग मोकळा



## खेवलकरांना अडकवण्याचा प्रयत्न, रोहिणी खडसेंचा आरोप

शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी बुधवारी पुणे पोलीस आयुक्त अमितेश गुप्ता यांची भेट घेतली. यावेळी त्यांचे वकील विजयसिंह ठोंबरेही उपस्थित होते. ड्रग्ज पार्टी प्रकरणात प्रांजल खेवलकर यांना अडकवण्याचा प्रयत्न आहे असा आरोप त्यांच्या वकिलांनी केला. रक्ताच्या चाचणीचे अहवाल लवकरात लवकर मिळावे अशी मागणी त्यांनी कलीय. पार्टीत उपस्थित मुलींशी खेवलकर यांचा काहीही संबंध नाही असं त्यांनी म्हटलं. प्रांजल खेवलकर यांना अटक केल्यानंतर त्यांच्या मोबाईल आणि लॅपटॉपमधील माहिती आणि फोटो खडसेंच्या विरोधी आमदाराकडे गेल्याचा आरोप रोहिणी खडसे यांनी केला. त्यासाठी रोहिणी खडसे आणि प्रांजल खेवलकरांचे वकील पुणे पोलीस आयुक्तालयात जाऊन चौकशीची मागणी करणारे पत्रही दिले.

पुणे । प्रतिनिधी

**एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना ड्रग्ज पार्टी प्रकरणी १४ दिवसांची न्यायालीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी आरोपींच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. पण न्यायालयाने पोलिसांची मागणी फेटाळली आणि आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे प्रांजल खेवलकरांच्या जामीनाचा मार्ग मोकळा झाला आहे.**

या आधी दोन महिलांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता उर्वरित पाच आरोपींनाही न्यायालीयन कोठडी सुनावण्यात आल्याने या सर्वांना जामीनाचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्रांजल खेवलकर यांच्या फोनमध्ये काही आक्षेपार्ह व्हिडीओ आणि चॅट सापडल्याची माहिती पुणे पोलिसांनी न्यायालयात दिली. प्रांजल खेवलकर याने एका मुलीचे व्हिडीओ दुसऱ्या आरोपीला पाठवत 'ऐसा माल चाहिए' असा मेसेज केला आहे. या सर्व प्रकरणाचा तपास करायचा आहे. त्यामुळे आरोपींची पोलीस कोठडी वाढवून द्यावी अशी मागणी सरकारी वकिलांनी केली होती. पण न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली.

ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना पुण्यात ड्रग्ज पार्टीत अटक झाली. आता या प्रकरणाची इनसाईड स्टोरी एबीपी माझाच्या हाती लागली आहे. पार्टी करण्याची हौस असलेल्या प्रांजल खेवलकरांच्या संपर्कात काही दिवसांपूर्वी श्रीपाद यादव आणि निखिल पोपटाणी हे दोघे आले. या दोघांचीही पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे .

श्रीपाद यादववर या आधी बेटींग प्रकरणात गुन्हे दाखल असून त्याला अनेकदा अटक देखील झाली आहे. तर निखिल पोपटाणी हा सिगारेटचा व्यवसाय करत असला तरी तो देखील बेटींगच्या दुनियेत बुकी म्हणून ओळखला जातो.

या दोघांनी प्रांजल यांच्या मित्रामार्फत त्यांच्याशी ओळख वाढवली आणि ते प्रांजल खेवलकर यांच्या सर्कलचा भाग बनले. शनिवारी देखील हे दोघे पार्टीत सहभागी झाले. यातील श्रीपाद यादवच्या सांगण्यावरुन दोन महिला तिथे आल्या आणि त्यापैकी एकीच्या पर्समधे अंमली पदार्थ सापडले.

# निकृष्ट रस्त्यामुळे ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू; औंधमधील दुर्दैवी घटना

पुणे । प्रतिनिधी

**औंध परिसरातील भाले चौकात निकृष्ट रस्त्यामुळे झालेल्या अपघातात एका ज्येष्ठ नागरिकाला आपला जीव गमवावा लागला. रस्ता आणि पेविंग ब्लॉकमधील खड्ड्यामुळे गाडी घसरल्याने हा अपघात घडला, ज्यामध्ये एका चारचाकी वाहनाखाली येऊन ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात संतापाची लाट पसरली असून, पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाच्या निष्काळजीपणावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही घटना ३० जुलै २०२५ रोजी घडली. जगन्नाथ काशिनाथ काळे (वय ६१) असे मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे.**

या घटनेनंतर औंध परिसरातील नागरिकांनी एकत्र येत पुणे महानगरपालिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. पथ विभागातील अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार न पाडल्याने औंधमधील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचा आरोप नागरिकांनी केला. रस्त्यांची दुरुस्ती वेळीच झाली असती तर ही दुर्घटना टळली असती, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली. तसेच, जबाबदारी न निभावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणीही त्यांनी केली.

अपघातानंतर प्रशासन खडबडून जागे झाले आणि दुसऱ्या दिवशी, ३१ जुलै रोजी सकाळीच रस्ता दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. मात्र, नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, एखाद्याचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येते का? रस्त्यांच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर यानिमित्ताने पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या दुर्दैवी घटनेने औंध परिसरातील रस्त्यांच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी, नागरिकांनी रस्त्यांच्या नियमित देखभालीसाठी आणि जबाबदारीच्या अभावी होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजनांची मागणी केली आहे. प्रशासन आता या मागण्यांना कशा पद्धतीने प्रतिसाद देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# १ ऑगस्टला पुण्यातील अनेक रस्ते राहणार बंद; 'या' पर्यायी मार्गांचा वापर करा

पुणे । प्रतिनिधी

१ ऑगस्टला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती असल्याने पुणे शहरातील वाहतूकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. या दिवशी शहरात विविध सामाजिक संस्था, स्थानिक मंडळे आणि राजकीय पक्षांच्या वतीने सारसबाग येथील त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येणार आहे.

तसेच या पार्श्वभूमीवर मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे शहरातील काही प्रमुख मार्गांवर वाहतूक बदल लागू करण्यात आले असून काही रस्ते तात्पुरते बंद राहणार आहेत. १ ऑगस्ट या दिवशी सकाळी ७ वाजल्यापासून आवश्यकतेनुसार पुण्यातील वाहतुकीमध्ये बदल करण्यात येणार आहेत.

मात्र, अत्यावश्यक सेवा वाहनांना यामध्ये सूट देण्यात आली आहे. त्यामुळे अग्निशमन दल, रुग्णवाहिका, पोलिस यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू राहणार आहेत. मिरवणुकीदरम्यान कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी वाहचालकांना मार्गदर्शक सूचना लक्षात घेऊन प्रवास करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या दिवशी पुणे शहरात आवश्यक त्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

या मार्गावर केले वाहतुकीत बदल



जेधे चौक ते सारसबागपर्यंतचा बालाजी विश्वनाथ पथ वाहतुकीसाठी बंद राहील.

- जेधे चौकाकडून सिंहगड रोडकडे जाण्यासाठी सातारा रोड – व्होल्गा चौक – मित्रमंडळ चौक – सावरकर चौक या पर्यायी मार्गाचा वापर करावा.- सिंहगड रोडवरून स्वारगेटकडे जाणारी वाहतूक दांडेकर पूल – नाथ पै चौक – ना.सी. फडके चौक – पुरम चौक – टिळक रोड – जेधे चौक मार्गे वळवण्यात येईल.- जेधे चौकातील वाय-जंक्शन (फ्लायओव्हर) वरून सारसबागकडे प्रवेश बंद राहील.- कात्रजहून येणाऱ्या वाहनांनी लक्ष्मीनारायण (व्होल्गा चौक) येथून डावीकडे वळावे.- वेगा सेंटर ते सारसबाग ग्रेडसेपरेटर हा मार्ग वाहतुकीसाठी बंद राहील.- वाहनचालकांनी राष्ट्रभूषण चौक ते हिराबाग चौक या पर्यायी मार्गाचा वापर करावा.- सावरकर चौक ते पुरम चौकदरम्यानची वाहतूक पूर्णतः बंद राहील.- नाथ पै चौक – सावरकर चौक – दांडेकर पूल – ना.सी. फडके चौक – कल्पना हॉटेल – टिळक रोड – पुरम चौक हा पर्यायी मार्ग खुला राहील.- दांडेकर पूल ते सावरकर चौककडे जाणारी वाहतूक बंद राहील.

- दांडेकर पूल व सावरकर चौकातील वाहतूक दुपारी ३ ते रात्री १२ वाजेपर्यंत दुहेरी मार्गाने सुरू ठेवण्यात येईल. - निलायम ब्रिजवरून सावरकर चौकाकडे जाणारी वाहने पर्वती गाव मार्गे वळवली जातील.

# पूर्ववैमनस्यातून तरुणाचा खून; खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी चौघांना अटक

पुणे । प्रतिनिधी

पूर्ववैमनस्यातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करून खून केल्याची घटना कात्रज भागात घडली. याप्रकरणी दहा जणांच्या टोळक्याविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अभिजित अवचरे (२९, रा. कात्रज गाव) असे मृताचे नाव आहे. ही घटना २९ जुलै रोजी घडली होती. उपचारादरम्यान अभिजितचा मृत्यू झाला. याप्रकरणी ओंकार राजेंद्र दानवले ( १९, रा. ओव्हाळ वाडा, कात्रज गाव) याने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार सोहम धुमाळ, संकेत रेणुसे, नवीन गागधरी आणि पृथ्वीराज पवार यांना अटक करण्यात आली आहे. तर सात अल्पवयीन मुले ताब्यात घेण्यात आली आहेत. पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, फिर्यादी दानवले याची धुमाळ, रेणुसे यांच्याशी भांडणे झाली होती. तर २९ जुलै रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास दानवले आणि त्याचा मित्र अवचरे दुचाकीवरून कात्रजमधील जैन मंदिराजवळून निघाले होता.

त्या वेळी आरोपी धुमाळ, रेणुसे यांच्यासह साथीदारांनी दुचाकीस्वार दानवले आणि मित्राला अडवून शिवीगाळ केली. टोळक्याने दोघांना मारहाण केली, तसेच दानवलेबरोबर असलेल्या मित्र अभिजितच्या डोक्यात तीक्ष्ण शस्त्राने वार केले. या घटनेत अभिजित गंभीर जखमी झाला. त्याला दवाखान्यात नेले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक स्वाती देवधर करीत आहेत.

सदरची कारवाई अमितेश कुमार (पोलीस आयुक्त), रंजन कुमार शर्मा (पोलीस सह आयुक्त ), राजेश बनसोडे (अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग), मिलींद मोहिते (पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२), राहुल आवारे (सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग), यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने आंबेगाव पोलीस स्टेशन यांचे सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर व रतिकांत कोळी, तसेच पोलीस अंमलदार शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, निलेश जमदाडे, बापु भिंगारे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, प्रमोद भोसले, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे, सुभाष मोरे, हरिश गायकवाड, अजय कामठे, ज्ञानेश्वर चित्ते, राकेश टेकवडे, शिवाजी पोटोळे तसेच कॉप्स २४ मार्शलचे दिपक गायकवाड, दत्तात्रय मेंगाळ, सागर खंडागळे, किरण कांबळे यांच्या पथकाने केली.

# कारगिल युद्धातील माजी सैनिकाला नागरिकत्व सिद्ध करण्यास भाग पाडल्याचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

कारगिल युद्धात भारतातील शेकडो जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. भारतासाठी ही लढाई अत्यंत निर्णायक आणि ऐतिहासिक होती. पण याच कारगिल युद्धात लढलेल्या एका जवानाची नागरिकता सिद्ध करण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप निवृत्त सैनिक हकीमुद्दीन शेख यांच्या कुटुंबियांकडून करण्यात आला आहे. वडिलांनी देशासाठी लढा दिला, आज त्यांना नागरिकत्व सिद्ध करायला सांगितलं जात आहे, अशी प्रतिक्रिया हकीमुद्दीन शेख यांच्या नातेवाइकांनी दिली. १९९९ च्या कारगिल युद्धात सहभागी झालेल्या हकमुद्दीन शेख यांच्या कुटुंबाने ही कारवाई अनपेक्षित आणि अपमानकारक असल्याचे म्हटले आहे.

पोलिसांसह ३० ते ४० जणांच्या गटाने त्यांच्या चंदननगर येथील राहत्या घरी छापा टाकत त्यांना त्यांच्या भारतीय नागरिकत्वाचा पुरावा सादर करण्यास भाग पाडले.ही घटना शनिवारी (२७ जुलै) रात्री उशिरा घडली. मध्यरात्री काही लोकांनी घरी येऊन ओळखपत्रे आणि अन्य कागदपत्रांची मागणी केली. त्यानंतर घरातील पुरुष सदस्यांना पोलिस ठाण्यात नेण्यात आले.

५८ वर्षीय हकीमुद्दीन शेख यांनी १९८४ साली लष्कराच्या २६९ अभियंता रेजिमेंटमध्ये भरती होऊन तब्बल १६ वर्षे सेवा दिली. १९९९ च्या कारगिल युद्धातही त्यांनी सहभाग घेतला होता. २००० मध्ये निवृत्त झाल्यानंतर काही काळ प्रतापगडमध्ये वास्तव्य केले, मात्र त्यांचे कुटुंब आजही पुण्यात वास्तव्यास आहे. त्यांचे मूळ गाव उत्तर प्रदेशातील प्रतापगड असून, १९६० पासून त्यांचे कुटुंब पुण्यात राहत आहे. तर हकीमुद्दीन शेख म्हणाले, मी १६ वर्षे भारतीय सैन्यात अभिमानाने सेवा दिली. १९९९ च्या कारगिल युद्धात लढलो. माझे संपूर्ण कुटुंब भारतीय आहे. मग आज आम्हाला आमचे नागरिकत्व सिद्ध करावे लागत आहे?असं म्हणत माजी सैनिक हकीमुद्दीन शेख यांनी उद्विग्न प्रतिक्रिया दिली आहे. २६ जुलैच्या रात्री पुण्यातील चंदननगर परिसरात, हकीमुद्दीन शेख यांच्या कुटुंबाच्या घरी पोलिसांसह ३० ते ४० लोकांनी धाड घालून कागदपत्रांची मागणी केली, असा गंभीर आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

# महापालिकेच्या शाळांमध्ये १८४ शिक्षक पदे रिक्त–काळभोर यांचे शिक्षण सहायक आयुक्त किरणकुमार यांना निवेदन

पिंपरी । प्रतिनिधी

स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातील महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. प्राथमिक शाळांमधील तब्बल १८४ शिक्षक पदे रिक्त आहेत. काळभोरनगर येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर शाळेत १५० विद्यार्थ्यांसाठी केवळ दोन शिक्षक कार्यरत आहेत. ही परिस्थिती विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम करणारी आहे.



यासंदर्भात युवा नेते विशाल बाळासाहेब काळभोर यांनी शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त किरणकुमार मोरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यांनी सर्व शाळांमध्ये तातडीने शिक्षकांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्याची मागणी केली.

महापालिका १०५ प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा चालवत आहे. या शाळांमधून सुमारे ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षाची पहिली घटक चाचणी परीक्षा ४ ते ६ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. यावर मोरे यांनी ऑगस्टअखेर रिक्त पदे भरली जातील, असे आश्वासन दिले आहे.

# दिव्यांग बांधवांमध्ये प्रचंड प्रतिभा असून त्यांना सर्वोत्तम सुविधा द्या : आयुक्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशनच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग बांधवांच्या उन्नतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. प्रत्येक नागरिकांमध्ये वेगवेगळी प्रतिभा दडलेली असते. त्याचप्रमाणे दिव्यांग बांधावांमधील प्रतिभा ओळखा व त्यानुसार त्यांना कामांचे वाटप करा. महापालिकेमधील सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांशी विभाग प्रमुखांनी चर्चा करावी, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात, त्यानुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार त्यांना सुविधा उपलब्ध करून द्या, असे निर्देश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील महत्त्वपूर्ण तरतुदी व माहिती याविषयी सर्वसमावेशक जनजागृती निमित्त आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. आयुक्त सिंह म्हणाले, ''महापालिका अधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ काय आहे, हे या कार्यशाळेच्या माध्यमातून सविस्तर समजावून घ्यावे. त्यानुसार महापालिकेमध्ये काम करणाऱ्या दिव्यांग बांधवांशी संवाद साधावा. त्यानुसार त्यांच्यामधील प्रतिभा ओळखावी, त्यांच्या मर्यादा ओळखा, व त्यानुसार कामांचे वाटप करा. पुढील




काळात शहरातील औद्योगिक क्षेत्रातील दिव्यांग बांधवांसाठी देखील अशीच प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करा.''

समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे यांनी प्रास्ताविक केले. दिव्यांग भवन फाउंडेशनच्या मानस शास्त्रज्ञ अपर्णा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. धनश्री नलावडे व माधुरी गाडेकर यांनी दुभाषक म्हणून काम पाहिले. दिव्यांग भवन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांनी आभार मानले.

# वडगावमध्ये अमली पदार्थांची खुलेआम विक्री, तरुणाई विळख्यात; पोलिसांचे मात्र दुर्लक्ष

वडगाव मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव शहरात अमली पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याने तरुणाई या अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालली आहे. तरुण पिढीला ड्रग, गांजा, गुटखा, आदी अमली पदार्थ सहज उपलब्ध होत आहेत. हे मागील काही घटनांमधून निदर्शनास आले आहे. त्यामुळे हे पदार्थ विक्री करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वडगाव शहर भाजपाच्या वतीने करण्यात आली आहे याबाबत पोलिस निरीक्षक कुमार कदम यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर, मुख्य विश्वस्त किरण भिलारे, मकरंद बवरे, युवा अध्यक्ष आतिश ढोरे, रविंद्र म्हाळकर ,नितीन ओव्हाळ, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदन म्हटले आहे की, मावळ तालुक्याचे मुख्यालय आहे वडगाव शहरात जिल्हा सत्र न्यायालय वडगांव पोस्ट ऑफिस, तालुका पंचायत समिती, शाळा, कॉलेज व इतर सरकारी/निमसरकारी कार्यालये आहेत.वडगांव-मावळ तालुक्याची क्रिडा नगरी म्हणून नावलौकिक आहे.



शहरात व आजूबाजूच्या गावांमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत. वडगांवचे जागृत देवस्थानला क दर्जा प्राप्त झालेला आहे. अशा नावलौकिक असणाऱ्या सांस्कृतिक वडगांव शहारात जुगार, मटका, असे अवैध धंदे तसेच बेकायदेशीर गावठी दारू, ड्रग्स, गुटखा, गांजा असे अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. असे जाणवत आहे. त्यामुळे गावातील शांतता सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता जाणवत आहे.

वडगाव परिसरातील, कुडे वाडा मातोश्री चौक सरदार महादजी शिंदे उद्यान परिसर,दिग्विजय कॉलनी,चौक, तळेगाव-वडगाव फाटा, ढोरे वाडा-केशवनगर परिसर, महामार्गावर लगत पान टपऱ्या आदी परिसरात खुलेआम अमली पदार्थांची विक्री होत असल्यामुळे स्थानिक शाळकरी, कॉलेज युवक, कष्टकरी युवक मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या आहारी जात आहेत. विक्री करणारे विक्री करतात परंतु खरेदी करणारा स्थानिक युवक नशाप्राशन करण्यासाठी उघड्यावर दिवसा कोणाला न जुमानता, न घाबरता नशा करताना दिसुन येत आहेत. मात्र या साऱ्या प्रकाराकडे वडगाव मावळ पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. अंमली पदार्थाचे आहारी तरूण पिढी मोठ्या प्रमाणात गेल्याचे जाणवत आहे. गुटखा चऊ व गांजा, दारू व इतर अंमली पदार्थ विक्रीचे काम छुप्या मार्गाने होत आहे.अंमली पदार्थ चऊड्रग्स, गांजा व गुटखा, दारू, ताडी यांसारखे अन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी व ते त्वरित बंद करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी बोलताना शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर म्हणाले की, वडगाव शहराची ओळख कला, क्रीडा सांस्कृतिक क्रीडा नगरी म्हणून ओळखली जात आहे या ठिकाणी शाळा व महाविद्यालयांच्या जवळ अनेक पान टपऱ्यांमध्ये, दुकानांमध्ये एमडी पावडर ड्रग्स गांजा तसेच काही व्यक्तींकडे आरोग्याला घातक गोष्टी सहज उपलब्ध होत आहेत. त्याची बिनदिक्कतपणे विक्री व सेवन केले जाते त्यामुळे या सर्व गोष्टींवर पोलिस प्रशासनाचा यावर वचक असावा, अशी मागणी म्हाळसकर यांनी केली आहे.

# श्री विठ्ठल मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी

शाळा चौकातील ऐतिहासिक श्री विठ्ठल मंदिराचा वर्धापन दिन भक्तिभावाने व धार्मिक उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे काकड आरतीने प्रारंभ झालेल्या कार्यक्रमात दिवसभर विविध धार्मिक उपक्रम पार पडले. उद्योजक प्रशांत एकनाथ दाभाडे व गौरी दाभाडे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुख्मिणी माऊलींचा अभिषेक आणि महापूजा पार पडली.



यानंतर श्री विष्णू सहस्त्रनाम पठण, भजन, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भजन सत्रात स्वर दिंडी भजनी मंडळ व पसायदान महिला भजनी मंडळ यांनी भावपूर्ण सादरीकरण करून वातावरण भक्तिमय केले.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन श्री विठ्ठल मंदिर संस्थेचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री संजय बाळा भेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.यावेळी साहेबराव दाभाडे, विजय दाभाडे, सिंधुताई दाभाडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाळकृष्ण आरडे महाराज, यतीनभाई शहा, हरिदास वनारसे, ह.भ.प. देवराम महाराज खराटे, विलास गायकवाड, नारायण धामणकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. या मंदिराची स्थापना नागपंचमीच्या दिवशी झाल्याची मान्यता आहे. त्यामुळे दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते आणि भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती पाहायला मिळते.